# Index


| Sr. No | Title | Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | लोकशाही प्रकारांचा तुलनात्मक अभ्यास | अशोक किसन वाकडे | 1-8 |
| 2 | भारतीय लोकशाहीचे भवितव्य | प्रा. रफिक नदाफ | 9-12 |
| 3 | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020, उच्च शिक्षण आणि विद्यार्थी | डॉ. पांडुरंग बाळकृष्ण पाटील | 13-28 |
| 4 | Reform in Education Sector and Indian Democracy | S. G. Patil<br>N. A. Patel<br>Dr. V. P. Shikhare | 29-37 |
| 5 | भारतीय लोकशाही राजकीय व्यवस्था - एक आढावा | प्रा. वर्षा मुरलीधर पोतदार | 38-44 |
| 6 | आदिवासी विमर्श - स्वरुप | प्रा. डॉ. हणमंत महादेव सोहनी | 45-48 |
| 7 | आदिवासी समाज एक चिंतन | प्रा.सौ. सुखदा सदाशिव हाटवळ | 49-52 |
| 8 | Ecology in Philip Larkin's Poetry | Dr. Kavita Tiwade<br>Dr. Salama Isak Maner | 53-59 |
| 9 | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020, उच्च शिक्षण आणि प्राध्यापक:एक अभ्यास | डॉ. पांडुरंग बाळकृष्ण पाटील | 60-68 |
| 10 | क्रांतिवीर दत्ताजीराव पाटील (तात्या) का स्वातंत्रता के लिए योगदान | प्रा.डॉ.सौ.वाघ शकुंतला प्रताप | 69-71 |
| 11 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सामाजिक लोकशाही | डॉ. अवधूत बाबासो टिपूगडे | 72-74 |
| 12 | जंगल के दावेदार' उपन्यास में लोकनायक बिरसा मुंडा के आदिवासी संघर्ष गाथा | रूपाली संभाजी पाटिल | 75-79 |

# लोकशाही प्रकारांचा तुलनात्मक अभ्यास

**अशोक किसन वाकडे**
विज्ञान महाविद्यालय, सांगोला
ता-सांगोला, जि. सोलापूर
413307

**सारांश**

लोकशाही ही एक जीवन पद्धती आहे. तो एक राज्यघटनेचा व राज्यव्यवस्थेचा प्रकार आहे. सामाजिक जीवनाच्या आवश्यकतेतून–अपरिहार्यतेतून जीवन व्यतीत करण्याच्या ज्या काही विचारप्रणाल्या आणि आचारधर्म प्रसृत झाले, त्यांपैकी लोकशाही ही एक आहे म्हणून समाज आणि संस्कृती यांना उद्देशून लोकशाही या शब्दाचा वापर करणे अर्थपूर्ण ठरते. समाज व संस्कृती यांचे वळण जर लोकशाहीपर नसेल, तर लोकशाही पद्धतीचे संविधान स्वीकारूनही त्या देशात लोकशाही रूजणे व टिकणे अवघड जाते. याउलट, एखाद्या देशात लोकशाही पद्धतीने दीर्घकाळ राज्यकारभार चालू असता, त्या देशातील समाजाला व संस्कृतीला लोकशाही वळण प्राप्त होते. अशा प्रकारे या दोन्हींमधील परस्परसंबंध स्पष्ट करता येतो.

**पारिभाषिक शब्द:** लोकशाही, तत्वविचार, लोकशाहीचे प्रकार, गुणदोष

**प्रस्तावना :**

प्रौढ मताधिकाराच्या आधारे, खुल्या व निःपक्षपाती निवडणुकांद्वारा लोकांनी निवणुकांद्वारा लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींद्वारे चालणारे राज्य. लोकशाही हा डिमॉक्रसी या इंग्रजी संज्ञेचा मराठी प्रतिशब्द. त्याची इंग्रजी व्युत्पत्तिकोशात डिमॉस (Demos) + क्रसी (Cracy) अशी फोड केली असून त्यांचा अनुक्रमे 'सामान्य लोक' व 'सत्ता' असा अर्थ दिला आहे.हा शब्द डिमॉस + क्रॅटोस (Demos + Kratos) या ग्रीक शब्दापासून झालेला असून त्याचे लॅटिन रूप डिमॉक्रॅशिया असे आढळते. या संज्ञेचा स्पष्ट अर्थ आणि संकल्पनेची काटेकोर व्याख्या, हे अद्यापि विद्वानांत विवाद्य विषय आहेत. अनेक आधुनिक विचारवंतांनी 'लोकशाही' या संकल्पनेची व्याख्या व फोड केलेली आहे. त्यापैकी अब्राहम लिंकन यांची 'लोकांचेच, लोकांनी केलेले, लोकांसाठी राज्य' ही व्याख्या लोकप्रिय व सुप्रसिद्ध आहे. लिंकन या संदर्भात पुढे म्हणतात, 'मला गुलाम म्हणून जसे जगण्यास आवडणार नाही, तद्वतच मालक म्हणून राहण्यास आवडणार नाही. माझ्या या उद्‌गारातूनच लोकशाहीची कल्पना व्यक्त होते.' 'बहुमतांचे राज्य' असेही लोकशाहीचे वर्णन केले जाते. लोकशाहीचे साक्षात (प्रत्यक्ष) आणि प्रातिनिधिक (अप्रत्यक्ष) लोकशाही असे दोन प्रमुख प्रकार सामान्यतः मानले जातात. आधुनिक काळात 'लोकशाही' हा शब्दप्रयोग सामान्यपणे प्रातिनिधिक लोकशाही या अर्थानेच केला जातो तथापि स्वित्झर्लंड आणि ऑस्ट्रेलिया या दोव देशांतून आजही साक्षात लोकशाहीचा प्रयोग काही प्रमाणात पाहावयास मिळतो. स्वित्झर्लंडमध्ये एकूण तीन हजार कम्यून असून सव्वीस कॅन्टन (घटक प्रदेश) आहेत. त्यांपैकी पाच कॅन्टनमध्ये वर्षातून काही दिवस सर्व नागरिक एकत्र जमतात. यावेळी सर्वच विधेयके चर्चेसाठी जनतेपुढे ठेवण्यात येतात आणि बहुमताने निर्णय घेतात. याशिवाय जनमतपृच्छा आणि उपक्रमाधिकार या प्रकारांनी प्रत्यक्ष लोकशाहीची उपयोजना इतर कॅन्टनमध्ये करण्यात आली आहे. ही पद्धत ऑस्ट्रेलियाच्या संविधानातही नमूद केलेली आहे परंतु तिचा प्रमुख्याने उपयोग संविधान दुरूस्तीच्या संदर्भातच करण्यात येतो.

लोकशाही ही एक जीवन पद्धती आहे. तो एक राज्यघटनेचा व राज्यव्यवस्थेचा प्रकार आहे. सामाजिक जीवनाच्या आवश्यकतेतून–अपरिहार्यतेतून जीवन व्यतीत करण्याच्या ज्या काही विचारप्रणाल्या आणि आचारधर्म प्रसृत झाले, त्यांपैकी लोकशाही ही एक आहे म्हणून समाज आणि संस्कृती यांना उद्देशून लोकशाही या शब्दाचा वापर करणे अर्थपूर्ण ठरते. समाज व संस्कृती यांचे वळण जर लोकशाहीपर नसेल, तर लोकशाही पद्धतीचे संविधान स्वीकारूनही त्या देशात लोकशाही रूजणे व टिकणे अवघड जाते. याउलट, एखाद्या देशात लोकशाही पद्धतीने दीर्घकाळ राज्यकारभार चालू असता, त्या देशातील समाजाला व संस्कृतीला लोकशाही वळण प्राप्त होते. अशा प्रकारे या दोन्हींमधील परस्परसंबंध स्पष्ट करता येतो.

**उद्दिष्टे:**

१) लोकशाही प्रकारांच्या तात्त्विक आधारांची चर्चा करणे

२) विविध लोकशाही प्रकारांचे गुणदोष यांची तुलना करणे

३) लोकशाही प्रकारांच्या रचनांची तुलना करणे

**उद्‌गम व विकास :**

लोकशाहीस काही अंशी पूरक असे प्रयोग प्राचीन ग्रीसमधील नगरराज्यांत, विशेषतः अथेन्समध्ये, इ.स.पू. पाचव्या शतकात झाले. अथेन्समध्ये महत्त्वाचे निर्णय अंमलातआणणारी एक समिती होती. तिचे सभासद व राज्याचे अधिकारी लोकांकडून निवडले जात. न्यायनिवाडासुद्धा सर्व नागरिक एकत्र जमून करीत. मर्यादित लोकसंख्येमुळे साक्षात (प्रत्यक्ष) लोकशाही प्रयोग तत्कालीन काही नगरराज्यांत शक्य झाला. सभागृहातील सभासद महत्त्वाच्या सार्वजनिक विषयांवर चर्चा करीत आणि नंतर मत व्यक्त करीत. प्रत्येक नगरराज्याच्या घटनात्मक प्रगतीचे मूलप्रवाह आणि प्रातिनिधिक स्वरूप पाहिले असता असे दिसते की, या नगरांचे नागरिकत्वकाही थोड्या लोकांपुरतेच मर्यादित होते. स्त्रियांना आणि गुलामांना मतदानाचा अधिकार नव्हता. सर्व पदांवर अर्थातच उच्चकुलीन पुरूषांनाच निवडण्यात येई. त्यामुळे राजकीय अधिकार नसलेले लोक खुद्द नागरिकांपेक्षा कितीतरू पटींनी जास्त होते. या मर्यादा लक्षात घेऊनही अथेन्समधील लोकशाहीमध्ये लोकशाही राज्यपद्धतीची बीजे आढळतात तथापि सर्वच ग्रीक नगरराज्यांनी लोकशाहीचा स्वीकार केल्याचे दिसत नाही. प्लेटो आणि ॲरिस्टॉटल हे दोन अथेनियन विचारवंत. प्लेटोने लोकशाहीला सैद्धांतिक तत्त्वांवर विरोध दर्शविला आहे. त्याच्या मते लोकांकडे आवश्यक असलेली नीतिमत्ता आणि बौद्धिक क्षमता नसेल, तर लोकशाही यशस्वी होणार नाही मात्र प्लेटो धनिकशाही किंवा हुकूमशाहीपेक्षा लोकशाही श्रेष्ठ आहे, असे स्पष्ट मत मांडतो. याउलट ॲसिस्टॉटलने या संकल्पनेला सहानुभूती दर्शविली आहे. त्याने राज्याचे वर्गीकरण तेथील सत्ताधाऱ्यांच्या सख्येवरून राजेशाही. उमरावशाही व लोकशाही असे केले आहे. लोकशाहीतील सत्तेचा उपयोग लोकहितार्थ केला जावा व नागरिकांनी प्रत्यक्षपणे राज्यकारभारात सहभागी व्हावे, अशी त्याची अपेक्षा होती. त्याने आपल्या *राज्यशास्त्र* ग्रंथात नागरिकांच्या शिक्षणाचा विचार मांडला असून कायद्याच्या राज्याला महत्त्व दिले आहे.

प्राचीन ग्रीस व रोमप्रमाणे भारतातही काही प्रदेशांत साक्षात लोकशाहीचा प्रयोग झाला होता. वेदोत्तर काळापासून गुप्तकाळापर्यंत राजाविरहित गणराज्ये होती. त्यांचे उल्लेख जैन, बौद्ध साहित्यातून तसेच *महाभारत, कौटिलीय अर्थशास्त्र, ऐतरेय ब्राह्मण* आणि ग्रीक लेखकांच्या वृतांतून मिळतात.गणराज्यांच्या काही मुद्राही मिळाल्या आहेत. यांतील बहुतेक गणराज्ये बिहार, सिंधू नदीचे खोरे आणि वायव्य प्रांत या भागांत होती.

यांत प्रदेशपरत्वे आणि कालानुसार सभेच्या कामकाजाच्या भिन्न पद्धती आढळतात. कोणत्याही सभासदाकडून प्रस्ताव मांडण्यात येई व त्यावर चर्चा होऊन मतदान घेण्यात येई. उघड व गुप्त दोन्ही प्रकारे मतदान केले जाई तथापि या व्यवस्थेत चातुर्वर्ण्य, त्यातील क्षत्रियांचे व काही क्षत्रिय कुलांचे श्रेष्ठत्व व वर्चस्व, त्यांच्या स्वतःच्या वंशाबद्दलचा अहंकार या लोकशाहीस बाधक गोष्टी तत्कालीन गणराज्यव्यवस्थेत होत्या. व्यक्तीस्वातंत्र्य आणि मूलभूत समानतेची कल्पना यांनाही त्यात स्थान नव्हते. शासनपद्धतीचा एक प्रकार या अर्थानेच यांना गणराज्य म्हणावयाचे एवढेच.

रोमच्या अधःपतनानंतर (इ. स. ४७६) सु. एक हजार वर्षे लोकशाही ही संकल्पनाच जवळजवळ लुप्त झाली होती. पुढे प्रबोधनकाल ( इ. स. चौदावे–सोळावे शतक) आणि धर्मसुधारणा आंदोलन (इ. स. सोळावे–सतरावे शतक) या काळात तिचे पुनरूज्जीलवन झाले धर्म, तत्त्वज्ञान व राजकारण यांबाबतीत लोक अधिक साहसी बनले. राजाच्या ईश्वरदत्त अधिकारांच्या कल्पनेला आव्हान देण्यात आले मार्टिन ल्यूथरने १५१७ मध्ये आपले पंचाण्णव सिद्धांत जाहीर करून कॅथलिक चर्चविरोधी आंदोलनास प्रारंभ केला. धर्मसुधारणा आंदोलनाचे यूरोपचे धार्मिक, वैचारिक आणि राजकीय जीवन ढवळून काढले. व्यक्तिस्वातंत्र्याचे मूल्य प्रथमतः धार्मिक जीवनात व नंतर जीवनाच्या सर्व अंगांत हळूहळू दृढमूल होऊन परिणामतः यूरोपीय संस्कृतीत समता, व्यक्तीस्वातंत्र्य आणि ऐहिक जीवनाची स्वायत्तता ही आधुनिक मूल्ये रूजली आणि त्यांना अनुसरून राजकीय जीवनाची क्रांतिकारक पुनर्रचना करण्याच्या प्रक्रियेला सुरूवात झाली. या काळातील मानवी संस्कृतीला लाभलेल्या व्यक्तिस्वातंत्र्य आणि ऐहिक स्वायत्तता या सर्वांत महत्त्वाच्या देणग्या होत.तत्पूर्वी यूरोप खंडात हा बदल घडत असतानाच लोकशाहीची जननी मानल्या गेलेल्या इंग्लंसडमध्ये तेराव्या शतकात जॉन राजाला मॅग्ना कार्टाला संमती देणे भाग पडले (१५ जून १२१५). इंग्लंडच्या घटनात्मक इतिहासात ह्या सनदेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे कारण तिच्यातील महत्त्वाची कलमे मूलभूत हक्कांविषयीची आहेत. त्यामुळेच मॅग्नात कार्टास इंग्रजी राज्यघटनेचे *बायबल* म्हणतात.यापुढील काळात राजाने पार्लमेंट भरविण्याची प्रथा पाडली. पार्लमेंटच्या रचनेत मात्र वेळोवेळी बदल झाले. स्ट्यूअर्टकाळात (१६०३ – १७१४) राजा आणि पार्लमेट यांतील संघर्ष विकोपाला गेला. पहिला चार्ल्स (कार. १६२५–४९) याच्या वेळी पार्लमेंटने आपल्या हक्कांचा एक मसुदा (पिटिशन ऑफ राइट्स) संमत करू घेऊन राज्याच्या स्वैर वर्तनावर निर्बंध लादले पण चार्ल्सने पुन्हा अनियंत्रित कारभार करण्यास सुरूवात केली. परिणामतः यादवी युद्ध उद्‌भवून चार्ल्सचा पराभव झाला. सैन्याने त्यास देहान्ताची शिक्षा दिली (१६४९).

**तत्त्वविचार व कार्यपद्धती :**

शासनव्यवहारात लोकांचा सहभाग, हे लोकशाहीचे प्रमुख व्यवच्छेदक लक्षण होय. मूलतः व अंतिमतः सत्ता लोकांच्या ठायी वास करते, या तत्त्वाचा आविष्कार मताधिकारात होत असतो. मानवी समाजाच्या स्वरूपाविषयी रूसोने सामाजिक कराराचा सिद्धांत मांडला. त्याच्या मते सर्वजन संकल्प ही सर्वांमध्ये सारखीच बसत असलेली पण अमूर्त अशी एक प्रेरणा आहे. राज्य ही त्या इच्छेने उभी केलेली यंत्रणा असून तिची सर्व कार्य पद्धती सर्वजन संकल्पावर अवलंबून असते. लोकशाहीच्या राजकीय विचारवंतांच्या संदर्भात ⇨ *सामाजिक करार* हा त्याचा सिद्धांत इंग्रजी विचारवंतांचा आर्थिक उदारमतवाद व फ्रेंच तत्त्वज्ञ माँतेस्क्यू याची प्रत्यक्षार्थवादी अभिवृद्धी या दोहोंच्या पलीकडे जातो. रूसोने प्रत्येक नागरिकाचा राज्यकारभारात सहभागी होण्याचा हक्क व जनतेच्या सार्वभौम अधिकाराचा पुरस्कार केला. त्याच्या या विचारांनी लोक भारले. राज्यसंस्था हा एक करार आहे, ही कल्पना रूसोपूर्वी टॉमस हॉब्ज आणि जॉन लॉक ह्या दोन तत्त्ववेत्यांनी विस्ताराने मांडली आहे. हॉब्जच्या मांडणीप्रमाणे

राज्यसत्तेला अनियंत्रित अधिकार मिळत होते, तर लॉकच्या विचारप्रणालीत राज्यसत्तेवर काही अल्पस्वल्प बंधने येत.लोकशाहीचा प्रगल्भ विचार उत्क्रांत होण्यामागे अनुभववादाचा वाटा मोठा आहे. लोकशाही जीवनपद्धती आणि तत्त्वज्ञान यांच्या विकासातील ते एक मूलतत्त्व आहे. यूरोपातील लोकशाहीवादी चळवळी ह्या सामाजिक सुधारणांच्या चळवळी होत्या. त्यांनी लोकशाहीच्या मूल्यांबाबत अनुभववादी तत्त्वज्ञान स्वीकारले. या चळवळीचे अग्रणी इंग्रजी उपयुक्ततावादी आणि अमेरिकन फलप्रामाण्यवादी यांनी हॉब्ज आणि डेव्हिड ह्यूम यांचा अनुभववादी मार्ग काही लक्षणीय बदल करून अंगीकारला. इंग्लंडमधील लोकशाही जीवनपद्धतीतील राजकीय उदारमतवादावर अनुभववादाचा प्रवर्तक जॉन लॉक याचा प्रभाव जाणवतो तर अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांतील उदारमतवादी व लोकशाही विचारसरणीवर जॉन ड्यूई (१८५९–१९५०) याच्या विवेकी अनुभववादाची छाप पडलेली दिसते. अनुभववादी तत्त्वज्ञानविषयक प्रवृत्ती ज्ञानाच्या इतर कोणत्याही तत्त्वसरणीपेक्षा लोकशाहीच्या विचाराला अधिक पोषक आहे, असे बर्ट्रंड रसेलसारखे तत्त्वज्ञ म्हणतात. ऐतिहासिक व मानसशास्त्रीय दृष्ट्याही ही गोष्ट सत्य असली, तरी तार्किक दृष्ट्या कोणताही तत्त्वविषयक सिद्धांत कोणत्याही राजकीय मताशी अनुकूल (जुळवून) करून घेण्यास समर्थ कौशल्याची जोड लागते. विवेकी अनुभववादाशी संबद्ध असलेली लोकशाहीतील दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे कोणत्याही प्रश्नावर व मुद्यावर मुक्त चर्चा आणि सहमती होय. व्यक्तीने स्वतःच्या निर्णयाने, स्वेच्छेने आत्मविकास साधला, तरच त्याला सार्थपणे विकास म्हणणे योग्य ठरते. स्वतंत्र व समान व्यक्तींना आत्मविकास साधण्यासाठी सर्वांत अनुरूप अशी व्यवस्था म्हणजे लोकशाही शासनव्यवस्था होय. ती एक अस्थितादर्शवादी (यूटोपियन) जीवन संस्कृती आणि राज्यविषयक सिद्धांतप्रणाली आहे. लोकशाहीत सर्व निर्णय बहुमताने घेतले जावेत, हा सामान्य संकेत आहे परंतु अल्पमतात असणाऱ्यांची योग्य ती दखल घेतली जाते किंवा नाही, त्यांचा सहभागाचा अधिकार अबाधित राहतो किंवा काय, हे पाहिले जावे. व्यवहारात अल्पमतवाल्यांना त्यांची मते मांडण्यास, त्यांचा पुरस्कार पूर्ण वाव व उत्तेजन दिले जावे. बहुमताने निर्णय घेताना त्यांच्या वास्तव मागण्यांचा आदर करण्यात यावा.लोकशाहीतील ‘लोक’ या शब्दात सामान्यतः सर्व प्रौढ नागरिकांचा समावेश होतो. वंश, जात, धर्म, भाषा, लिंग, आर्थिक उत्पन्न वा मालमत्ता, व्यवसाय इ. गोष्टींवरून भेदाभेद न करता, विवक्षित सर्व प्रौढ व्यक्तींना (अठरा वर्षांवरील) नागरिकत्वाचे आणि मतदानाचे समान हक्क बहाल करणे, हे लोकशाहीतील प्रधान तत्त्व मानले गेले आहे. लोकसहभागाचा प्राथमिक व पायाभूत आधार, असे या हक्कांचे स्थान आहे. नागरिकाचा पूर्ण सहभाग असण्यासाठी त्याला मूलभूत हक्क आणि नागरी स्वातंत्र्ये मिळाली पाहिजेत, या भूमिकेतून देशाच्या लिखित संविधानातच त्यांचा अंतर्भाव केलेला असतो. आणीबाणीसारख्या एखाद्या विशेष प्रसंगी काही काळ ह्या हक्कांवर निर्बंध लादण्यात येतात किंवा त्यांचा संकोच होतो. या मताधिकाराचा वापर करून स्थानिक ते राष्ट्रीय पातळींवरील बहुविध निवडणुकांत नागरिक मतदान करून मत व्यक्त करतात आणि प्रतिनिधी निवडतात. हा लोकांचा अपेक्षित न्यूनतम सहभाग म्हणता येईल. हा सहभाग न्यूनतम असला, तरी लोकशाही प्रक्रियेत त्यास विशेष महत्त्व आहे कारण लोकशाहीत नियतकालिक निवडणुका ही आवश्यक ही बाब असून लोकशाहीच्या अभिवृद्धीसाठी वा सुदृढ बांधणीसाठी मुक्त व दबावरहित वातावरणात निवडणुका होणे, हे अत्यंत गरजेचे असते. न्यायसंस्थेतील वरिष्ठ जागा कार्यकारी मडळातर्फे सरन्यायधीशांच्या सल्ल्यानुसार भरण्यात येतात. मात्र कनिष्ठ जागांसाठी कार्यक्षम उमेदवारांना परीक्षा घेऊन मुलाखतींतून निवडले जाते. ही पद्धत त्यांतल्या त्यात स्वीकारार्ह मानण्यात आली आहे. निःपक्षपाती न्यायदानाची परंपरा असलेल्या लोकशाही देशांतून ही पद्धत प्रचारात आहे. न्यायसंस्थेच्या कार्यपद्धतीत कोणीही

हस्तक्षेप करू नये, अशी अपेक्षा असते, तरच न्यायदानाचे काम निःपक्षपाती व समाधानकारक होईल.बहुमताच्या आधारे सार्वजनिक निर्णय घेणे, त्याकरिता नियतकालिक निवडणुका मुक्त आणि दडपणविरहित वातावरणात होणे, सार्वत्रिक प्रौढ मताधिकार, नागरी स्वातंत्र्य व विचारांचे मुक्त आदान-प्रदान, लोकाभिमुख प्रशासन, स्वतंत्र व निःपक्षपाती न्यायमंडळ इ. लोकशाही शासनाचे अनिवार्य घटक म्हणून सांगता येतात.लोकशाही संकल्पना प्रथम पश्चिम यूरोपात विकसित झाली, म्हणून ती पश्चिमी लोकशाही या नावाने परिचित झाली आणि प्रसिद्ध पावली. अमेरिका, ग्रेट ब्रिटन तसेच नॉर्वे, स्वीडन, डेन्मार्क इ. स्कँडिनेव्हियन देश, फ्रान्स, पश्चिम जर्मनी (संयुक्त जर्मनी) ही यूरोपातील लोकशाहीची काही ठळक उदाहरणे होत. या देशांतून मुक्त वातावरणात निवडणुका होतात, तेथे वृत्तपत्रस्वातंत्र्य आहे, तसेच कायद्यासमोर सर्व व्यक्ती सारख्या असून भाषणस्वातंत्र्य, एकत्र जमण्याचे स्वातंत्र्य आणि स्वेच्छाव्यवसाय निवडण्याचे स्वातंत्र्य आहे. या सर्वांपेक्षा शासनाला विरोध करण्याचा हक्क आहे. थोडक्यात, पाश्चात्य लोकशाही संकल्पनेत नागरी स्वातंत्र्ये आणि मूलभूत हक्क यांवर कोणतेही निर्बंध नाहीत. लोक हेच आपल्या हिताचा विचार करणारे उत्तम परीक्षक असतात म्हणून त्यांना त्यांचे विचार मोकळेपणाने (खुलेपणाने) मांडण्याचा अधिकार व स्वातंत्र्य दिले पाहिजे , हा विचार प्रसृत झाला आहे. अमेरिका-ग्रेट ब्रिटन या देशांतील प्रातिनिधिक लोकशाही शासनपद्धतीचा आदर्श बहुतेक सर्व विकसनशील देशांनी दुसऱ्या महायुद्धानंतर आपल्यापुढे ठेवलेला दिसतो. त्या दृष्टीने जपान, भारत, श्रीलंका, बांगला देश, पाकिस्तान वगैरे देशांतून लोकशाहीचा कमी-अधिक प्रमाणात प्रयोग चालू आहे. इतर बहुसंख्य आशियाई व आफ्रिकी देशांमध्ये एकपक्षीय राजवटी अथवा हुकूमशाही शासनपद्धती आढळतात तथापि यांतील काही देशांमध्ये लोकशाहीवादी चळवळी मूळ धरीत आहेत आणि तेथे लोकशाहीच्या दिशेने प्रवास चालू आहे. फिलिपीन्स, म्यानमार (ब्रह्मदेश), नेपाळ, झँबिया ही याची काही ठळक उदाहरणे होत. भारतातील लोकशाही शासनपद्धती ही जगातील लोकसंख्येने सर्वांत मोठी असलेली लोकशाही आहे. लोकशाही मूल्यांवर श्रद्धा व दुसऱ्याच्या मतांविषयीचा आदर, हा लोकशाहीचा गाभा येथे आढळतो. आपल्या विचारांच्या विरूद्ध असलेल्या मतांविषयी केवळ सहिष्णुताच न दाखविता त्या विचारांचा मान राखला जातो, यावर भारताच्या लोकशाहीची यशस्विता अवलंबून आहे. वैचारिक संघर्ष सहजतेने स्वीकारणे, हीच भारतीय लोकशाहीची खरी शक्ती आहे. १९९१ च्या सार्वत्रिक निवडणुकात सकारात्मक धोरणावर मतदान झाल्यामुळे लोकसभेला प्रथमच बहुपक्षीय स्वरूप प्राप्त झाले. कोणताच एक पक्ष बहुमतात न आल्यामुळे सर्वांत जास्त जागा मिळविलेला काँग्रेस (इं.) पक्ष सत्तास्थानी आला. त्याला बहुमतासाठी मित्रपक्ष व अपक्षांचे सहकार्य प्रसंगोपात्त घ्यावे लागते. स्वातंत्र्योत्तर काळात सुरूवातीची सु. पंचवीस वर्षे एकाच पक्षाचा साचेबंदपणा, अशिक्षित मतदार आणि बहुपक्षीयांचे अस्थैर्य यांवर भारतीय लोकशाही हिंदोळे घेत होती. आता निवडणूक पद्धतीतही काही सुधारणा होऊ घातल्या आहेत. गोस्वामी समितीने सुचविलेल्या सुधारणांच्या अनुषंगाने काही शिफारशींचा विचार झाला, तर पुढील निवडणुकांत लोकशाहीची प्रक्रिया अधिक विशुद्ध स्वरूपात पाहावयास मिळेल, असा राजकीय विचारवंत विश्वास व्यक्त करतात. आशिया खंडातील अन्य देशांत, विशेषतः पाकिस्तान-बांगला देश यांमध्ये एकचालकानुवर्ती राजकारण (प्रशासन) चालू आहे. दारिद्य,रूढिग्रस्त व अशिक्षित लोक, अतिरेकी धर्माभिमान, सरंजामशाहीचा प्रभाव, लोकशाही मूल्यांचा व परंपरांचा अभाव आणि दुर्बळ राजकीय पक्ष ही या दोन देशांतील आजवरची परिस्थिती लक्षात घेता, तेथे लोकशाही फार काळ स्थिरावत नाही, हा इतिहासाचा दाखला आहे. या देशांत काही काळ मर्यादित लोकशाही होती आणि नंतर मर्यादित हुकूमशाही आली मध्यंतरीच्या काळात प्रच्छन्न

लष्करी कायद्याखालीच राज्यकारभार चालला होता. या दोन्ही देशांत १९९१ च्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर लोकशाही प्रस्थापित करण्याच्या प्रक्रियेला प्रारंभ झाला आहे परंतु त्यांचे अंतर्गत राजकारण, सैन्यदल, आय्. एस्. आय्. ही लष्कराची गुप्तहेर संघटना (पाकिस्तान) आणि मुल्ला-मौलवींचे वर्चस्व यांमुळे लोकशाहीची स्थिती काहीशी दोलायमान झाल्यासारखी दिसते.साम्यवादी देशांत, विशेषतः रशिया आणि त्याची अंकित राष्ट्रे व चीन यांत, एकपक्षीय हुकूमशाही वा कम्युनिस्ट राजवट अस्तित्वात आली. काही थोड्या फरकाने आणि थोड्या कमी प्रमाणात यूगोस्लाव्हिया, चेकोस्लोव्हाकिया वगैरे देशांतूनही हा प्रकार आढळतो. साम्यवादी तत्त्वचिंतकांची विशेषतः मार्क्स, लेनिन-स्टालिन यांची लोकशाहीबद्दलची उपपत्ती वेगळी आहे. त्यामुळे उत्पादन व वाटपावर नियंत्रण ठेवणाऱ्या शासनयंत्रणा साम्यवाद्यांनी निर्माण केल्या तथापि साम्यवादाला होणारा विरोध मोडून काढण्यासाठी सर्वच साम्यवादी देशांमध्ये एकपक्षीय राजवटी अस्तित्वात आल्या. कमीअधिक प्रमाणात या सर्वच राजवटींनी लोकशाहीची मुलभूत वैशिष्ट्येच टाकून दिली. सर्वंकष राजवटी व बंदिस्त समाज असे चित्र त्यामुळेसाम्यवादी देशांमध्ये निर्माण झाले. या देशांतील सर्व शासकीय व्यवहार कम्युनिस्ट पक्ष वा त्या पक्षातील एक निवडक गट राबवीत असतो. शासन व शोषणविरहित स्वतंत्र व समान व्यक्तींचा स्वतंत्र समाज, हे मार्क्सवादाचे अंतिम राजकीय उद्दिष्ट आहे परंतु व्यक्तिस्वातंत्र्यवादी म्हणून जे मार्क्सचे तत्त्वज्ञान अस्तित्वात आले, त्याच्या आधाराने ज्या नवीन राजवटी निर्माण झाल्या, त्या सर्व अखेर व्यक्तिस्वातंत्र्यविरोधी ठरल्या आहेत.

**लोकशाहीचे प्रकार :**

प्रातिनिधिक लोकशाहीचे संसदीय व अध्यक्षीय लोकशाही असे सांप्रत कार्यवाहीत असलेले दोन प्रमुख प्रकार आढळतात. पहिल्यात, कार्यकारी मंडळ (मंत्रिमंडळ) आणि संसद ह्यांच्या परस्परसंबंधांवर आधारित असा शासनाच्या संघटनांचा हा प्रकार असून मंत्रिमंडळ हे संसदेला जबाबदार असते. बहुमतातील पक्षाचा नेता हा या मंडळाचा प्रमुख (पंतप्रधान) असतो आणि शासनपद्धती सामूहिक जबाबदारीच्या तत्त्वावर चालते. ग्रेट ब्रिटन हे याचे उदाहरण असून कॅनडा, ऑस्ट्रेलिया,भारत आदी देशांत ही पद्धत रूढ आहे. अध्यक्षीय शासनपद्धतीत मंत्रिमंडळ संसदेपासून अलिप्त असते आणि अध्यक्षाची जनतेकडून सरळ निवड होते. या पद्धतीत संसदीय पद्धतीप्रमाणे कार्यकारी मंडळ संसदेतील बहुमतावर अवलंबून नसते आणि कार्यकारी प्रमुख हाच राष्ट्राध्यक्ष असतो. ही पद्धत प्रामुख्याने अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांत आढळते. थोड्याफार फरकाने फ्रान्स, श्रीलंका इ. देशांतूनही ती प्रचारात आहे.या प्रमुख प्रकारांशिवाय उदारमतवादी लोकशाही, समाजवादी लोकशाही, भांडवलशाही लोकशाही, सहभागप्रधान लोकशाही, शिष्टजनवादी लोकशाही, मार्गदर्शित लोकशाही वगैरे काही विशिष्ट विचारप्रणाली आणि ध्येयधोरणे यांचा पुरस्कार करणाऱ्या लोकशाही संकल्पना प्रसृत झाल्या. तसेच औद्योगिक वा आर्थिक लोकशाही अशाही काही मर्यादित क्षेत्रापुरत्या स्वयंशासन सुचविणाऱ्या कल्पना दुसऱ्या महायुद्धानंतर प्रचारात आल्या.लोकशाहीच्या मूलभूत घटकांविषयी मतैक्य असले, तरी आर्थिक-सामाजिक प्रश्नांविषयीची भूमिका काय असावी आणि लोक–सहभागाची व्याप्ती किती असावी, हे मतभेदाचे मुद्दे असून त्याआधारे लोकशाहीची भिन्नभिन्न प्रारूपे मांडली जातात. व्यक्तिस्वातंत्र्य हेच सर्वाधिक महत्त्वाचे मूल्य मानून प्रातिनिधिक शासनपद्धतीचा पुरस्कार करणाऱ्या लोकशाहीस उदारमतवादी लोकशाही असे म्हणतात. आर्थिक–सामाजिक विषमतेविषयी या प्रकारात कोणतीही ठाम भूमिका घेतली जात नाही. केवळ व्यक्तिस्वातंत्र्य हेच व्यक्तिविकासाला पुरेसे आहे आणि राजकीय लोकशाही व आर्थिक क्षेत्रातील शासनाचा शक्य तेवढा मर्यादित सहभाग यांवर उदारमतवादी लोकशाहीचा दृढ

विश्वास असतो. एकोणिसाव्या शतकात यूरोपात या प्रकारचा लोकशाही विचार प्रसार पावला. अशा लोकशाहीत भांडवलशाही फोफावते व त्यामुळे समता अस्तित्वात येऊ शकत नाही, अशी टीका त्यावर केली जाते. उदारमतवादी लोकशाहीवर टीका करणाऱ्यांत मार्क्स व त्याचे साम्यवादी अनुयायी विचारवंत गे अग्रेसर होते.उदारमतवादी लोकशाहीची भांडवलशाही लोकशाही अशी त्यांनी संभावना केली आणि ती बेगडी लोकशाही असल्याचे प्रतिपादन केले.या भांडवलशाही लोकशाहीची अशा पद्धतीने रचना केलेली असते,की निवडणुका कशाही प्रकारे झाल्या किंवा राजकीय पक्ष कोणत्याही पद्धतीने संघटित झाले, तरी निर्णायक सत्ता ही नेहमी भांडवलदारवर्गाच्या हातांत किंवा त्यांचे हितसंबंध जपणाऱ्या प्रतिनिधींकडे जाते, अशी टीका मार्क्सवाद्यांनी केली. यावर उपाय म्हणजे प्रथम भांडवलदारवर्गाशी लढा देऊन भांडवलशाही व्यवस्था दूर केली पाहिजे म्हणजे खरीखुरी ‘जनतेची लोकशाही’ अस्तित्वात येऊ शकेल, असे प्रतिपादन मार्क्सवाद्यांनी केले.समाजवादी प्रेरणा व लोकशाही या परस्परव्यावर्तक बाबी नसल्याने लोकशाहीची कास न सोडता समाजवादाची प्रस्थापना करता येईलत्यासाठी हिंसापूर्ण क्रांतीची अथवा हुकूमशाहीची आवश्यकता नाही, असा विचार विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात अनेक विचारवंतांनी मांडला. या मांडणीस ‘लोकशाही समाजवाद’असे म्हटले जाते. लोकशाही पद्धतीत आर्थिक–सामाजिक विषमता दूर करण्याचे प्रयत्न करता येतात. यावर लोकशाही समाजवाद्यांचा विश्वास असतो.

**निष्कर्ष:**

राजेशाही, हुकूमशाही, सर्वंकषवादी, साम्यवादी इ. शासनप्रकारांपेक्षा लोकशाही शासनप्रकार आधुनिक काळात अधिक प्रचलित झाला. सामूहिक हित या तत्त्वानुसार तो स्वीकारार्ह असल्यामुळे जगातील बहुसंख्य देशांनी लोकशाही शासनपद्धतीचाच अवलंब केलेला दिसून येतो.

आधुनिक लोकशाहीत नागरिकांकडे फक्त मतदारांचीच भूमिका असते. दोन निवडणुकांमधील कालावधीत नागरिकांकडे काहीच काम नसते. त्यामुळे कार्यपद्धतीत नागरिकांचा सक्रिय सहभाग नसतो आणि काही निवडक लोकच प्रत्यक्षात राज्यकारभार करीत असतात व त्यांचे समाजावर वर्चस्व असते, अशी सर्वसाधारण टीका लोकशाहीवर करण्यात येते. या टीकेला शिष्टजनवादी लोकशाहीचा पुरस्कार करणारे गॉएटॉनो मोस्कॉ, रोबेर्ट मिकल्स, शुंपेटर वगैरे काही राजकीय विचारवंत उत्तरादाखल म्हणतात, की विशेषीकरणाच्या या युगात प्रत्येक क्षेत्रात तज्ञ व कुशल व्यक्तींच्या हाती निर्णय सोपविले जाणे, हे स्वाभाविक आहे कारण या गुंतागुंतीच्या व्यवहारात ते अपरिहार्य आहे याकरिता मिकल्सने अल्पजनसत्तेचा अपवादरहित सिद्धांत मांडला आहे. शुंपेटर याच्या मते, लोकशाही म्हणजे सर्व निर्णय लोकांनी घेणे असे नव्हे. सामान्य नागरिकांना प्रशासनात व निर्णयप्रक्रियेत रस नसतो आणि आवश्यक असणारे कौशल्यही त्यांच्यात आढळत नाही. साहजिकच या विचारसरणीमुळे सामान्य नागरिकाचा सहभाग कमी होतो, ही चिंतेची बाब आहे शिवाय प्रातिनिधिक लोकशाहीत निर्वाचित प्रतिनिधी हे निर्णय घेताना मतदारांच्या विचारापेक्षा आपल्या व्यक्तिगत विवेकबुद्धीवर भर देतात आणि निर्णय घेतात, म्हणून रूसोसारखे तत्त्वज्ञ या प्रकाराला लोकशाहीच मानीत नाहीत. प्रतिनिधी निवडण्याची कोणतीही पद्धत वापरली, तरी जनतेच्या मतांचे खरेखुरे प्रतिनिधित्व तीत होईलच, विशेषतः अल्पमताचे प्रतिनिधित्व होईल, याची शाश्वती नाही कारण प्रतिनिधी निवडण्याखेरीज नागरिकांना फारशी राजकीय भूमिकाच उरत नाही. त्यामुळे नागरिक राजकीय सहभागाविषयी उदासीन बनतात. तसेच प्रातिनिधिक लोकशाही मर्यादित शासन किंवा जबाबदार शासनपद्धती निर्माण करते, असे तिचे समर्थक म्हणतात परंतु व्यवहारात प्रत्यक्षात प्रतिनिधींचे शासन असते काय, हा मूलभूत प्रश्न

आहे कारण स्त्रिया, कामगार, कनिष्ठवर्ग यांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात खरोखरीच प्रतिनिधित्व मिळते काय? बहुपक्षीय पद्धती अस्तित्वात असलेल्या बहुतेक सर्व देशांत बहुमतातील पक्ष सत्ता हस्तगत करतो परंतु निवडणुकीत अनेकदा इतर सर्व विरोधी पक्षांच्या तुलनेत सांख्यिकीय दृष्ट्या त्या पक्षास प्रत्यक्षात कमी मते मिळालेली असतात. त्यामुळे 'बहुमताचे राज्य' ही लोकशाहीतील मूळ कल्पनाच व्यवहारात नाकारली जाते.लोकशाही राज्यपद्धतीत राजकीय, आर्थिक व्यवहारांवर तसेच निर्णयप्रक्रियेवर राजकीय पक्षांचे आणि भांडवलदारवर्गांचे वर्चस्व निर्माण होत आहे. प्रभावी संघटित हितसंबंधी गट, वर्ग, उद्योगसमूह, बहुराष्ट्रीय कंपन्या, कामगार संघटना इत्यादींची हितसंबंधी उद्देशांबद्दल चढाओढ चालू असते. त्यांचा प्रभावही शासनावर पडत आहे. हीही गोष्ट लोकशाहीच्या अभिवृद्धीस बाधक ठरत आहे. केवळ कायदा व सुव्यवस्था हा शासनाचा प्रांत न राहता, जीवनाच्या सर्व क्षेत्रांत शासनाने पुढाकार घेऊन नियमन व नियंत्रणास प्रारंभ केल्यापासून नोकरशाहीचे प्राबल्य वाढले आहे. सामाजिक समता व न्यायावर आधारित समाजव्यवस्था, हे लोकशाहीचे तत्त्व जनसेवेला गौणत्व प्राप्त झाल्याने दुर्लक्षिल्यासारखे झाले आहे. ते प्रतिनिधींना तसेच नागरिकांना प्रसंगोपात्त जाचक ठरत आहे. तसेच कायद्याने समानतेचे तत्त्व मान्य केले असले, तरी व्यवहारात आर्थिक व सामाजिक समतेच्या अभावी सर्व नागरिक खऱ्या अर्थाने नागरी स्वातंत्र्ये उपभोगू शकत नाहीत. त्यामुळे अर्थव्यवहाराची मूलभूत उद्दिष्टे व अंतःसूत्रे आणि लोकशाहीची मूल्ये व ध्येये यांच्यात विसंवाद वाढत आहे. म्हणून समानतेच्या प्रस्थापनेशिवाय लोकशाही अपूर्णच राहते, ही बाब आता तत्त्वतः मान्य झाली आहे. तसेच समता, न्याय व सार्वजनिक हित या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी व्यक्तिस्वातंत्र्यावर काही मर्यादा वा निर्बंध घालणे, हे लोकशाहीत अपरिहार्य ठरते.

**संदर्भ :** 1. Altekar, A. S. *State and Government in Ancient India*, Delhi, 1958.
2. Barry, B. M. *Sociologists, Economists and Democracy*, Chicago, 1978.
3. Bhambhri, C. P. *Elections 1991 : An Analysis*, London, 1991.
4. Bryce, James, *Modern Democracies, Two Vols.*, Calcutta, 1962.
5. Cohen, Carj, *Democracy*, London, 1971.
6. Dahl, Robert A. *Democracy and Its Crities*, New Delhi, 1991.
7. Dahl, Robert A. *Preface to Economic Democracy*, New Delhi, 1991.
8. Diamond, Larry Juan Linz &amp Lipset, S. M. Ed. *Democracy in Asia*, New Delhi, 1989.
9. Fowler, W. W. *The City State of the Greeks and Romans*, London, 1960.
10. Lawson, Don, *Democracy*, New York, 1978.

# भारतीय लोकशाहीचे भवितव्य

**प्रा. रफिक नदाफ**
काशीबाई नवले कॉलेज एज्युकेशन
कमलापूर,
ता. सांगोला, जिल्हा सोलापूर
Mob: 9975171614

**सारांश :**

व्यक्तीच्या जीवनातील प्रत्येक घटकावर त्या देशातील शासन व्यवस्था सामाजिक परिस्थिती संस्कृती व सभ्यतेचा परिणाम होत असतो लोकशाही ज्या देशांमध्ये आहे अशा देशातील नागरिकांना उत्तम प्रकारचे वातावरण मिळते त्यांच्या अधिकारांचे रक्षण होते त्यांना वेगवेगळ्या प्रकारची स्वातंत्र्य असते व्यक्तीच्या सामाजिक व्यक्तिगत विकासातून राष्ट्रीय विकासाची संकल्पना साकार करण्यासाठी लोकशाही शासन व्यवस्था आदर्श मानली जाते. भारत हा एक जगातील सगळ्यात मोठा लोकशाही शासन व्यवस्था असलेला देश आहे. विधिमंडळ, न्यायपालिका, कार्यपालिका व प्रसारमाध्यमे हे लोकशाहीचे चार स्तंभ आहेत. यांचे स्थान व अस्तित्व अबाधित असणे लोकशाही जिवंत राहण्यासाठी अत्यावश्यक असते. हळूहळू लोकशाहीस बाधक असे वातावरण देशांमध्ये निर्माण होत आहे. वेळीच आपण जागे झालो नाही तर याचे गंभीर परिणाम भारतीय समाजाला भविष्यात भोगावे लागतील. यासाठी सर्वच व्यक्तींनी देशांमध्ये लोकशाही टिकून राहावी यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे.

**पारिभाषिक शब्द:** लोकशाहीसमोरील आव्हाने, माध्यमे आणि लोकशाही, विकास, धार्मिक वाद

**प्रस्तावना:**

भारत हा एक प्रचंड विविधता असलेला देश म्हणून ओळखला जातो. भौगोलिक,भाषिक, धार्मिक, सामाजिक व आर्थिक दृष्ट्या आपण विभागलेलो आहोत; असे असताना सुद्धा आपल्याला एकत्र ठेवणारी गोष्ट म्हणजे भारतीय लोकशाही आहे. भारतावर शासन करायचे असल्यास लोकशाहीशिवाय दुसरी कुठलीही शासन पद्धती यशस्वी ठरली नसती. भारताने मागील हजार ते दीड हजार वर्षात जे पाहिले आहे त्यावरून असे म्हणता येईल की धर्म असो किंवा राजेशाही असो यावर आधारित शासनापासून लोकांना काहीही मिळाले नव्हते, परिणामी मुघल आणि इंग्रजांनी भारतावर राज्य केले. कारण त्यावेळी शासन हे मूठभर लोकांच्या हाती होते. आज १४० कोटी लोकसंख्या असलेल्या देशांमध्ये स्थैर्य ठेवायचे असल्यास सर्वच राज्यांना, सर्व धर्मीयांशी कोणताही भेदभाव न करता त्यांना प्रत्येक क्षेत्रात समान संधी दिली पाहिजे, तरच देशात शांतता स्थैर्य लाभू शकते व लोकशाहीची मुळे आपण मजबूत करू शकतो.

**भारतीय लोकशाहीचा भूतकाळ**

भारतीय लोकशाहीचे भवितव्य पाहण्यापूर्वी आपल्याला याचा भूतकाळ व वर्तमान काळ पाहिला पाहिजे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पहिल्या निवडणुकीमध्ये काँग्रेस पक्षाला बहुमत मिळाले व पंडित जवाहरलाल नेहरू यांनी देशाचे नेतृत्व केले. रेल्वेमंत्री असताना केवळ एका अपघाताला स्वतःला जबाबदार धरून आपला राजीनामा देणारे

रेल्वेमंत्री लालबहादूर शास्त्री सारखे नेते देशाला मिळाले या वेळेपर्यंत नैतिकतेला लोकशाहीमध्ये जागा होती. पुढे इंदिरा गांधीच्या नेतृत्वामध्ये देशाने लोकशाहीची गळचेपी करणारा आणीबाणीचा काळ सुद्धा पाहिला. लोकांनी याच इंदिरा गांधींना सत्तेपासून दूर ठेवले. पुढे लोकांनी याच इंदिरा गांधींना प्रचंड बहुमताने निवडून दिले. आज पर्यंतच्या ७५ वर्षाच्या इतिहासामध्ये जवळजवळ पन्नास वर्षे काँग्रेसने सत्ता आपल्या हातात ठेवली होती. राजीव गांधीच्या हत्येनंतर गांधी घराण्याची राजकारणावरची पकड ढिली होत गेली. धर्म आणि राजकारण याचे मिश्रण सत्तेत येण्यासाठी संजीवनी ठरू शकते हे लालकृष्ण अडवाणी यांनी देशाला दाखवून दिले. पुढे आघाडीचे शासन देशाने पाहिले अनेक पक्षाने एकत्र येऊन देश चालवण्याचा प्रयत्न केला परंतु राजकीय अस्थिरता देशाने पाहिली. पहिल्यांदाच भारतीय जनता पार्टीच्या नेतृत्वात अटल बिहारी वाजपेयी यांनी सत्तेची सूत्रे आपल्या हातात घेतली. पुढील पाच वर्षात मनमोहन सिंग यांच्या कारकीर्दीत भारतीय लोकशाहीतील नव्या पर्वाची चाहूल लागू लागली. २०१४ साली देशात प्रचंड बहुमत असलेले भारतीय जनता पार्टीचे सरकार राज्य करू लागले व ते आज पर्यंत सुरू आहे हा झाला भूतकाळ.

**सध्या देशातील परिस्थिती**

1. धार्मिक ध्रुवीकरण : धर्माच्या आधारावर ध्रुवीकरण करण्याचा आरोप काँग्रेस पक्षावर लावण्यात येत होता परंतु काँग्रेसेतर पक्ष सत्तेवर आल्यानंतरही त्यांनी या विषययावर ध्रुवीकरण करण्यास सुरुवात केली एवढेच नव्हे तर आपल्या पक्षाशी संबंधित व्यक्तींनी धार्मिक मुद्द्यांवर काही आपेक्षार्य वक्तव्य केल्यास त्याला मूक पाठिंबा दिला एवढेच नव्हे तर अशा व्यक्तींना महत्वाची पदे दिली. यांच्या कार्य करण्याच्या पद्धतीवर सर्वोच्च न्यायालयाने अनेक वेळा ताशेरे ओढलेले आहेत.
2. धार्मिक व सांस्कृतिक हक्कांची पायमल्ली : देशात काही वर्षापासून विशिष्ट धर्माला त्यांच्या धार्मिक व सांस्कृतिक बाबींना लक्ष करून त्रास दिला जात आहे. मग त्यांचे कपडे असतील, त्यांच्या खाण्याच्या पद्धती असतील, त्यांची लग्न व्यवस्था असेल या सर्व बाबींवर आक्षेप घेत, तसेच त्यांना मुख्य समाजापासून वेगळे करण्याचे प्रयत्न सध्या होताना दिसत आहे. असे असताना सुद्धा सत्तेत असणारे निमुटपणे पाहत आहेत. यामुळे अशी कृत्य करणाऱ्या व्यक्तींना बळ मिळत आहे.
3. मनमानी निर्णय घेणे: नोटबंदी सारखे उपाय करत असताना विरोधी पक्षाला विश्वासात न घेता देशातील एक संस्थांना विचारात न घेता असे निर्णय घेतले गेले. यासारखे अनेक निर्णय घेणे घेतले खाजगीकरण असो किंवा नवनवीन योजना असो यातून शासनाने स्वतःचे अंग काढून घेण्याचा प्रयत्न केला आहे. एवढेच नव्हे तर संरक्षण सारख्या संवेदनशील बाबींचे सुद्धा खाजगीकरण केले गेले. भविष्यात शिक्षण, आरोग्य यासारख्या सुविधांचे खाजगीकरण केले जाईल अशी शासनाची भूमिका आहे. अशावेळी विरोधी पक्ष किंवा जनतेचा विरोध लक्षात घेतला जात नाही.
4. अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर मर्यादा : मागील काही वर्षापासून लोकांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर मर्यादा आणल्याचे दिसून आले आहे. समाजमाध्यम असो किंवा इतर ठिकाणी शासनावर टीका केल्यास पत्रकारांना तुरुंगात पाठवले जाते, अशा अनेक घटना घडलेल्या आहेत. दुसरीकडे आपल्या पक्षाच्या बाजूने शासनाच्या बाजूने बोलणाऱ्या व्यक्तींना मोकळी सूट दिले जाते. जवळजवळ सर्वच बातम्या देणारे टीव्ही चॅनल हे कोणत्या ना कोणत्या उद्योगपतींच्या हातात आहेत व या ठिकाणी सत्तेच्या विरुद्ध कोणतेही प्रश्न न विचारणे, लोकांना

ज्वलंत प्रश्नापासून दूर ठेवणे, विरोधी पक्षातील लोकांना संसदेत बोलू न देणे, विरोधी पक्षांवर अघोषित बहिष्कार टाकणे यासारख्या गोष्टी होताना दिसत आहे लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून ओळखला जाणारा मीडिया आज आंधळया व बहिऱ्या व्यक्तीसारखा झालेला आहे.

5. विशिष्ट उद्योगपतींना संरक्षण देणे : निवडणुकीच्या काळात ज्या उद्योगपतींनी शासनातील व्यक्तींना केली आहे पुढे सत्य झाल्यानंतर अशा व्यक्तींना मदत करून त्यांना पुढे आणण्याचा प्रयत्न केला जात आहे खाजगीकरणाच्या माध्यमातून देशाची संपत्ती कवडीमोल भावात अशा उद्योगपतींना देण्यात येत आहे मागील काही वर्षात अशा उद्योगपतींची लाखो कोटी रुपयांची गरजे शासनाने माफ केलेली आहे उद्योगपतींना राजाश्रय देण्याची ही पद्धत देशाला परवडणारी नाही.
6. शिक्षणाकडे दुर्लक्ष : वरचेवर शिक्षणावरचा खर्च कमी केला जात आहे. मागील काही वर्षात नवीन शैक्षणिक धोरण जाहीर झाल्यानंतर सुद्धा जी आर्थिक तरतूद करणे अपेक्षित होते ती केली गेली नाही. याचे परिणाम पुढील काळात नक्कीच दिसून येतील भारतीय शैक्षणिक क्षेत्राला जी गती मिळाली आहे त्याला नियंत्रित ठेवण्याचे काम सध्याचे सरकार करत आहे. अल्पसंख्यांक समाजाची शैक्षणिक आर्थिक तरतूद वरचेवर कमी केली जात आहे, हे लोकशाहीच्या दृष्टीने घातक आहे. भारतीय शैक्षणिक संस्थांवर अनेक निर्बंध लादणे व परदेशी शैक्षणिक संस्थांना भारतामध्ये सर्व सुविधा उपलब्ध करून देणे व त्यांना कोणतेही निर्बंध त्यांच्यावर कोणतेही निर्बंध न ठेवणे यासारख्या चुकीच्या गोष्टी सध्या होताना दिसत आहे.

अशा प्रकारची परिस्थिती देशांमध्ये असताना भारतीय लोकशाहीचे भवितव्य कसे असेल हे पुढील मुद्द्यांवरून लक्षात येईल.

**भारतीय लोकशाहीचे भवितव्य :**

1) केंद्र व राज्य शासन यांच्यातील संघर्ष : सध्या मागील काही वर्षापासून दिल्लीत निवडून आलेला पक्ष हा केंद्रात सत्तेत असलेल्या पक्षाच्या विरोधातील पक्ष आहे. केंद्र शासनाने यांच्यावर अनेक निर्बंध लादलेले आहेत. महाराष्ट्र शासन असो किंवा कर्नाटक या राज्यातील राजकीय अस्थिरता निर्माण करण्यामध्ये व सत्तापरिवर्तन घडवून आणण्यात केंद्राची भूमिका महत्वाची होती. भविष्यात केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्यातील संघर्ष पुढे कोणत्या टोकापर्यंत जाऊ शकतो हे यावरून दिसून येते. पुढेही अशीच उदाहरणे दिसून येतील व केंद्र व राज्य सरकार यातील संघर्ष वाढत जाईल.
2) सध्याच्या सत्तापक्षाने धार्मिक मुद्द्यांवरून अनेक वादग्रस्त निर्णय घेतलेले आहे यामुळे समाजात तेढ तर निर्माण झालेलीच आहे पुढेही ही तेढ वाढत जाईल असे वातावरण निर्माण केले जात आहे विशिष्ट धर्माच्या लोकांना त्रास देणे, त्यांना आपल्या आपल्या पक्षात स्थान देणे. धार्मिक मुद्द्यांवर आक्रमक बोलणाऱ्यांना सत्तेत वाटा देणे या सारखी उदाहरणे गंभीर आहेत. मार्च २०२३ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने अशा घटना व व्यक्तींच्या वक्तव्यावर कारवाई करण्याच्या सूचना केल्या आहेत.
3) सत्तेशी संघर्ष वाढेल : देशातील बेरोजगारी आरोग्यसेवा शिक्षण अनियंत्रित खाजगीकरण यामुळे लोक रस्त्यावर उतरत आहेत, संघर्ष करत आहे. यामुळे भविष्यात काही परिस्थिती आणखीन चिघळण्याची शक्यता आहे. यामुळे अर्थव्यवस्थेची नुकसान होईल सामाजिक व आर्थिक विषमता वाढेल.

4) अघोषित हुकुमशाही: लोकशाही कमकुवत करून अघोषित अशी हुकूमशाही स्थापित होण्याची शक्यता निर्माण झालेली आहे. बऱ्याच लोकांना धर्मावर आधारित शासन असावे असे वाटते व हे दाखवण्याचा प्रयत्नही केला जात आहे. अनेक गोष्टींवरून स्पष्ट दिसून येते की शासन धर्मनिरपेक्ष लोकशाही ची मूल्ये पायदळी तुडवत आहेत. पुढे याची किंमत समाजाला मोठी किंमत देऊन मोजावी लागेल इंग्रजांना आपण देशाबाहेर हाकलून शकलो परंतु यानंतर जर लोकशाही संपली तर सत्तेत असणाऱ्यांना हाकलने व पुन्हा लोकशाहीची स्थापना करणे हे मागील स्वातंत्र्य आंदोलनापेक्षाही अधिक कठीण असेल हे मात्र नक्की.

आजपर्यंत देश जे धर्मावर आधारित शासन चालवतात त्या देशातील लोकांना दिले जाणारे अधिकार हे खूपच कमी आहेत. त्यांचे सामाजिक जीवन खालच्या स्तराचे आहे असे दिसून येते. भारतातली परिस्थिती निर्माण होऊ द्यायची नसेल तर सर्वांनीच लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे यासाठी जे अयोग्य घडत आहे त्याच्याविरुद्ध किमान आवाज उठवण्याची गरज सुशिक्षित समाजाकडून केली जाऊ शकते.

**संदर्भ :**


1. https://drrahulrajani.com
2. https://www.orfonline.org/marathi/fate-of-plural-democratic-india-62009/
3. https://www.deshdoot.com/blog/sunday-special-article-what-will-be-the-future-of-indian-democracy

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020, उच्च शिक्षण आणि विद्यार्थी

## (National Education Policy2020,Higher Education and Students)

**डॉ. पांडुरंग बाळकृष्ण पाटील.**
ग्रंथपाल,
श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय ,
दसरा चौक कोल्हापूरमहाराष्ट्र,.
ईमेल:librarianshahaji@gmail.com
मोबाईल नंबर:9272474354 .

**सारांश** :

सदर लेखात नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 आणि उच्च शिक्षण याची माहिती थोडक्यात दिलेली आहे. या धोरणाबाबत विद्यार्थ्यामध्ये जाणीव जागृती होण्याच्या दृष्टीने लेख ,व्याख्याने,इतर माध्यमातून विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक धोरणाची आणि शिक्षणाबाबतच्या तरतुदीची माहिती दिली होती. या अनुषंगाने विद्यार्थ्यांच्याकडून गुगल फॉर्मच्या माध्यमातून प्रश्नावली भरून घेण्यात आली. 470 विद्यार्थ्यांनी यास प्रतिसाद दिला. या प्रतिसादाचे विश्लेषण करून निष्कर्ष मांडण्यात आले व पुढे संशोधनासाठी काही शिफारसी सुचवण्यात आलेल्या आहेत. साधारण 70 टक्के विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक धोरणातील तरतुदींची माहिती आहे .परंतु या नवीन धोरणाबाबत अजूनही विद्यार्थ्यांच्या मध्ये जनजागृती करण्याची आवश्यकता वाटते हे सदर संशोधनावरून सिद्ध होत आहे.

**Key Word:** NEP, ABC, Library, Higher Education

**प्रस्तावना:**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 हे भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाने 29 जुलै 2020 रोजी लागू केले.1986 च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या जागी हे धोरण लागू करण्यात आले.नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण प्राथमिक शिक्षण ते उच्च शिक्षण आणि व्यावसायिक शिक्षणासाठी मार्गदर्शन करते.भारताच्या शिक्षण व्यवस्थेत अमुलाग्र बदल करणे, परिवर्तन करणे हे या धोरणाचे उद्दिष्ट आहे.या धोरणातील मसुद्यात उच्च शिक्षणाविषयी 11 प्रकरणे आहेत. तीन भागाद्वारे तरतुदींची माहिती दिलेली आहे. हे धोरण पदवी स्तरावर 2022-23 या शैक्षणिक वर्षापासून विद्यार्थ्यांना लागू करण्यात आलेले आहे. या धोरणाची माहिती तसेच उच्च शिक्षणाविषयी माहिती विद्यार्थ्यांना वर्गात जाऊन सदर संशोधकाने दिलेली आहे. तसेच लेखाच्या माध्यमातून व इतर ज्ञान साहित्याच्या माध्यमातून अधिकाधिक विद्यार्थ्यांच्या पर्यंत याची माहिती देण्याचा प्रयत्न केलेला आहे. गुगल फॉर्मच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी प्रश्नावली तयार करून उच्च शिक्षण आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण याबाबत विद्यार्थ्यांना कितपत जाणीव जागृती आहे याचा शोध घेण्याचा प्रयत्न सदर संशोधकाने केलेला आहे. 470 विद्यार्थ्यांनी या प्रश्नावलीस प्रतिसाद देऊन सर्व प्रश्नांची उत्तरे देण्याचा प्रयत्न केलेला आहे. या उपलब्ध माहितीचे विश्लेषण करून त्याचे निष्कर्ष मांडण्यात आलेले आहेत व या आधारे काही शिफारसी ही सदर संशोधकाने सुचवलेल्या आहेत .

**उद्दिष्टे :**

1.नवीन शैक्षणिक धोरण2020 आणि उच्च शिक्षण याबाबतची माहिती जाणून घेणे.

2. या शैक्षणिक धोरणाबाबत विद्यार्थ्यांच्यामध्ये जनजागृती वाढवणे.

3. विद्यार्थ्यांच्याकडून गुगल फॉर्मच्या माध्यमातून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण व उच्च शिक्षणाबाबतची माहिती संकलित करणे.

4. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि उच्च शिक्षणाबाबत विद्यार्थ्यांच्या कडून संकलित झालेल्या माहितीचे विश्लेषण करणे व निष्कर्ष काढणे .

5.पुढील संशोधनासाठी शिफारशी सुचवणे.

**संशोधन कार्यपद्धती :**

हा लेख उपलब्ध झालेल्या ज्ञान स्त्रोतावर आणि इंटरनेट व इतर उपलब्ध माहितीवर तसेच विद्यार्थ्यांनी भरून दिलेल्या गुगल फॉर्मच्या माध्यमातून दिलेल्या प्रश्नावलीचे विश्लेषण करून तयार करण्यात आलेला आहे. श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयातील बहुतांशी विद्यार्थ्यांना यात सहभागी करून घेण्यात आलेले आहे.

**NEP 2020 संदर्भातील माहिती, ठळकमुद्दे**

*नवीन शैक्षणिक धोरण २०२०ला मंजूरी :* २०२२-२०२३ पासून लागू होणार

NEW EDUCATION POLICY 2020 :

*केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाचं नामकरण आता"शिक्षण मंत्रालय" असं आहे.

नवीन शिक्षण धोरण २०२० यांना मंत्रिमंडळाने हिरवा झेंडा दाखवला आहे.३४ वर्षांनंतर शिक्षण धोरण बदलले आहे.

नवीन शिक्षण धोरणाची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत :

३ ते १४ वर्ष वयोगटाचे विद्यार्थी शिक्षण हक्क कायद्याच्या कक्षेत आले आहेत. यापूर्वी हा वयोगट ६ ते १४ वर्षे होता...

**५ वर्षे मूलभूत Fundamental :**

१. नर्सरी - ४ वर्षे ४. इयत्ता पहिली - ७ वर्षे

२. जूनियर केजी- ५ वर्षे ५. इयत्ता दुसरी - ८ वर्षे

३. एसआर केजी- ६ वर्षे

**३ वर्षांची प्रारंभिक शाळा Preparatory :**

६. इयत्ता तिसरी - ९ वर्षे ७. इयत्ता चौथी - १० वर्ष

८. इयत्ता पाचवी - ११ वर्षे

**३ वर्षांची माध्यमिक शाळा Middle :**

९. इयत्ता सहावी - १२ वर्षे

१०. इयत्ता सातवी - १३ वर्ष ११. इयत्ता आठवी - १४ वर्षे

**४ वर्ष माध्यमिक शाळा Secondary :**

१२. इयत्ता नववी -१५ वर्षे १३. इयत्ता दहावीची - १६ वर्षे

१४. एफ.वाय.जे.सी. - १७ वर्षे १५. एस.वाय.जे.सी. - १८ वर्षे

**ठळक वैशिष्ट्ये :**

बोर्ड फक्त १२ वीच्या वर्गाला असेल. महाविद्यालयीन पदवी ४ वर्षांची असणार आहे

दहावी मंडळ रद्द. (SSC) एमफिल MPhil देखील बंद असेल.

आता पाचवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना केवळ मातृभाषा, स्थानिक भाषा आणि राष्ट्रीय भाषा शिकविली जाईल. उर्वरित विषय जरी तो इंग्रजी असला तरी एक विषय म्हणून शिकविला जाईल आता बोर्ड परीक्षा फक्त १२वी मध्ये द्यावी लागेल. तर यापूर्वी दहावीची बोर्ड परीक्षा देणे बंधनकारक होते, ते आता होणार नाही. ९वी ते १२वीच्या सत्र परीक्षा असतील Semester Exam. शालेय शिक्षण ५ + ३ + ३ + ४ सूत्रांच्या (वरील सारणी पहा) अंतर्गत शिकवले जाईल. महाविद्यालयीन पदवी ३ व ४ वर्षांची असेल. म्हणजेच, पदवीच्या पहिल्या वर्षात तुम्हाला प्रमाणपत्र मिळेल,* दुसर्या वर्षी पदविका असेल, तरतृतीय वर्षात डिग्री मिळेल. जे संशोधनासाठी उच्च शिक्षण घेऊ इच्छितात त्या विद्यार्थ्यांसाठी चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम तर जे विद्यार्थी पदवीनंतर नोकरी करू इच्छितात त्यांच्यासाठी तीन वर्षांचा पदवी अभ्यासक्रम असेल. विद्यार्थ्यांना यापुढे एमफिल MPhil करावे लागणार नाही. म्हणजेच, रिसर्च करणाऱ्यांसाठी पदवी अधिक एक वर्षांचा मास्टर्स अभ्यासक्रम अशी चार वर्षांची पदवी असेल. यानंतर ते थेट पीएचडी Ph.D.करू शकतील.

दरम्यान विद्यार्थी इतर कोर्स करू शकतील. उच्च शिक्षणामध्ये Higher Education २०३५ पर्यंत एकूण सकल पट नोंदणी Gross Enrolment Ratio २०३५ पर्यंत ५०% पोहोचवण्याचं उद्दिष्ट आहे.दुसरीकडे नवीन धोरणांतर्गत जर एखाद्या विद्यार्थ्याला कोर्सच्या मध्यभागी दुसरा कोर्स करायचा असेल तर तो मर्यादित काळासाठी पहिल्या कोर्समधून ब्रेक घेऊन दुसरा कोर्स करू शकतो.

उच्च शिक्षणातही अनेक सुधारणा केल्या आहेत. सुधारणांमध्ये श्रेणीबद्ध शैक्षणिक Graded Academic, प्रशासकीय Administrative आणि आर्थिक स्वायत्तता Financial Autonomy यांचा समावेश आहे.त्याशिवाय ई-कोर्सेस प्रादेशिक भाषांमध्येही सुरू केले जातील. आभासी Virtual लॅब विकसित केल्या जातील. राष्ट्रीय शैक्षणिक वैज्ञानिक मंच (NETF) सुरू होईल.सर्व सरकारी Government, खासगीPrivate आणि,मान्यताप्राप्त संस्थांसाठी,Deemed Universityसमान नियम असतील... मल्टीडिसिप्लिनरी अभ्यासक्रम: एकाच वेळी वेगवेगळे विषय एकत्रितपणे शिकता येणार आहेत. यात मेजर आणि मायनर असे विषयांचे विभाजन असेल. आर्थिक किंवा अन्य कारणांमुळे होणारे ड्रॉपआऊट यामुळे कमी होतील. शिवाय ज्यांना एखादा विषय आवडीचा असेल तो विषय त्यांना शिकता येईल...

लॉ आणि मेडिकल शिक्षण वगळता उच्च शिक्षण एका छताखाली येणार आहे. शिक्षणातील गुंतवणूक जीडीपीच्या ६% करणार, सध्या हे प्रमाण ४.४३% आहे.विद्यार्थ्यांचे प्रगती पुस्तक बदलणार. शिक्षकांसोबतच विद्यार्थीदेखील स्वत:चे मूल्यांकन करणार आहेत.सर्व महाविद्यालयांसाठी एकच सामायिक प्रवेश परीक्षा असणार आहे.एनटीए ही परीक्षा घेणार. मात्र ही परीक्षा ऐच्छिक असेल. बहुभाषिक शिक्षण - मुलांना शिकवताना एकाच भाषेच्या माध्यमातून अध्यापन न करता विविध प्रादेशिक भाषांचा वापर करता येणार...

या नियमानुसार नवीन शैक्षणिक सत्रे सुरू करता येतील.

**नवीन शैक्षणिक धोरण व उच्च शिक्षण:-**

उच्च शिक्षणाविषयी महत्वाच्या शिफारशी असणारी 11 प्रकरणे या भागात आहेत.त्यामध्ये प्रकरण क्रमांक 9 ते 12 ,15 ते 19 व 22 व 23 अशी प्रकरणे आहेत.यामध्ये पदवी स्तरावर शिक्षण अभ्यासक्रम, संशोधन पदव्यांचे स्वरूप, शिखर संस्था, विद्यार्थी प्रवेश, विद्यापीठाचे स्वरूप इत्यादी महत्त्वाच्या तरतुदी या प्रकरणांमध्ये आढळतात उच्च शिक्षणाबाबत महत्त्वाच्या शिफारसी पुढीलप्रमाणे

भाग 1:

भारतातील उच्च शिक्षणासाठी नवीन आणि भविष्यमुखी दृष्टिकोन या धोरणामध्ये ठेवलेला आहे .संस्थांची पुनर्रचना आणि बळकटीकरण, अधिक सर्वांगीण आणि बहुशाखीय शिक्षणाच्या दिशेने पाऊल शिक्षणासाठी अनुकूल वातावरण आणि विद्यार्थ्यांचा सहयोग प्रेरित उत्साह, सक्षम शिक्षक, उच्च शिक्षणातील समता आणि सर्वसमावेशकता,शिक्षकांचे शिक्षण, व्यावसायिक शिक्षणाची पुनर्कल्पना, नवीन राष्ट्रीय संशोधन फाउंडेशनच्या माध्यमातून दर्जेदार शैक्षणिक संशोधनाला चालना देणे,उच्च शिक्षणाच्या नियमाप्रमाणे नियामक प्रणालीचा कायापालट करणे,उच्च शिक्षणाच्या संस्थांमध्ये प्रभावी व्यवस्थापन आणि नेतृत्व करणे.

भाग २: विचार करण्याचे इतर महत्त्वाचे केंद्रीय मुद्दे

व्यावसायिक शिक्षण प्रौढ शिक्षण आणि निरंतर अध्ययन, भारतीय भाषा,कला संस्कृतीला प्रोत्साहन, तंत्रज्ञानाचा वापर आणि एकात्मिकरण ऑनलाईन आणि डिजिटल शिक्षण तंत्रज्ञानाचा समान वापर सुनिश्चित करणे

भाग तीन : अंमलबजावणी

केंद्रीय शिक्षण सल्लागार मंडळाचे सक्ष्मीकरण, अर्थ पुरवठा,सर्वांसाठी परवडण्याजोगे आणि दर्जेदार शिक्षण,अंमलबजावणीप्राचार्य सुधाकर मानकर यांनी लिहिलेल्या उच्च शिक्षण विषयक नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 या पुस्तकात वरील मुद्द्यांचा सविस्तर उहापोह केलेला आहे.

**सारणी क्रमांक 1 - राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020**

| Sr.No | Number | Total |
|---|---|---|
| 1 | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 | 440 |
| 2 | आर्थिक धोरण 2020 | 19 |
| 3 | राष्ट्रीय आरोग्य धोरण 2020 | 11 |




**विश्लेषण :**

1) 1986 राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या जागी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 हे 34 वर्षानंतर लागू झाल्याची माहिती 93.6% विद्यार्थ्यांनी बरोबर दिली आहे.6.4% विद्यार्थ्यांना किती वर्षांनी हे धोरण लागू झाले याची नक्की माहिती नाही.




**2)** डॉकस्तुरीरंगण आयोगाने मनुष्यबळ विकास म .के .ंत्रालयास राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा अहवाल सादर केला हे बरोबर उत्तर 90.6% विद्यार्थ्यांनी दिले आहे




3) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये शिक्षणाचे 10 + 2+ 3 हे प्रारूप बदलून त्याच्या जागी 5 + 3 + 3+ 4 हे नवे प्रारूप स्वीकारले गेले हे बरोबर उत्तर .83.6% विद्यार्थ्यांनी दिले आहे मात्र .16.4% विद्यार्थ्यांना या प्रश्नाचे बरोबर उत्तर देता आले नाही.




4) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 हे भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाने 29 जुलै 2020 रोजी लागू केले हे बरोबर उत्तर 94.9% विद्यार्थ्यांनी दिले आहे 6.1% विद्यार्थ्यांनी मात्र हे धोरण अर्थ मंत्रालय अगर ग्रह मंत्रालय यांनी लागू केल्याचे चुकीचे उत्तर दिले आहे.

5)1986 च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या जागी .....वर्षानंतर नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 हे लागू करण्यात आले या प्रश्नाचे , 34 वर्षानंतर हे बरोबर उत्तर 93.4% विद्यार्थ्यांनी दिले आहे तर 6.6% विद्यार्थ्यांनी 40 व 20 हे पर्याय निवडलेले आहेत.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात प्राथमिक शिक्षण ते ........ शिक्षणापर्यंत आणि व्यावसायिक शिक्षणापर्यंत मार्गदर्शन करण्यात आले आहे

470 responses




6) नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात प्राथमिक शिक्षण ते उच्च शिक्षणापर्यंत आणि व्यावसायिक शिक्षणापर्यंत मार्गदर्शन करण्यात आले आहे हे बरोबर उत्तर 96 % विद्यार्थ्यांनी दिलेले आहे.4% विद्यार्थ्यांनी वैद्यकीय शिक्षण , तांत्रिक शिक्षण अशी चुकीची उत्तरे दिलेली आहेत.

भारतीय शिक्षण व्यवस्थेत अमुलाग्र बदल करणे,परिवर्तन करणे हे .........शैक्षणिक धोरणाचे एक उद्दिष्ट आहे

470 responses



7) भारतीय शिक्षण व्यवस्थेत अमुलाग्र बदल करणे हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे उद्दिष्ट आहे. असे बरोबर उत्तर 87.4% विद्यार्थ्यांनी दिलेले आहे तर 12.6% विद्यार्थ्यांनी अन्य पर्यायाला पसंती दिल्याने ते उत्तर चुकीचे ठरलेले आहे .




8) राष्ट्रीय शिक्षण धोरणाची अंमलबजावणी पदवी स्तरावरील प्रथम वर्ष 2022 -23 पासून झाल्याचे बरोबर उत्तर 74.7% विद्यार्थ्यांनी दिलेले आहे ..25.3% विद्यार्थ्यांनी मात्र चुकीची उत्तरे दिलेली आहेत .




9) कोरोना महामारीच्या काळात ऑनलाइन शिक्षणावर भर देण्यात आल्याचे 96.8% विद्यार्थ्यांनी बरोबर उत्तर दिलेले आहे .




10)एन ई पी 2020 चा फुल फॉर्म सांगा या प्रश्नाचे नॅशनल एज्युकेशन पॉलिसी 2020 असे बरोबर उत्तर 81.3% विद्यार्थ्यांनी दिले आहे न्यू एज्युकेशन पॉलिसी असे 17.4% विद्यार्थ्यांनी चुकीचे उत्तर दिलेले आहे.




11) केंद्रीय मनुष्य व विकास मंत्रालयाचे नामकरण आता शिक्षण मंत्रालय असे झाले आहे हे बरोबर उत्तर 80 % विद्यार्थ्यांनी दिलेले आहे मात्र 20% विद्यार्थ्यांनी सहकार मंत्रालय अगर युवक कल्याण मंत्रालय असे चुकीचे पर्यायाला पसंती दिली आहे त्यामुळे त्यांचे उत्तर चूकलेली आहे.

शिक्षणाचे नवे प्रारूप 5+3+3+4 यामध्ये पाच वर्षे मूलभूत शिक्षण ,तीन वर्षे प्रारंभिक शिक्षण, तीन वर्षे माध्यमिक शिक्षण आणि चार वर्षे ........शिक्षण असे आहे. .

470 responses




12) शिक्षणाचे नवे प्रारूप 5+3+3+4 यामध्ये पाच वर्षे मूलभूत शिक्षण तीन वर्षे प्रारंभिक शिक्षण तीन वर्षे माध्यमिक शिक्षण आणि चार वर्षे .... शिक्षण असे आहे. असा प्रश्न विचारला होता त्यासाठी पदवी शिक्षण हा बरोबर पर्याय 81.7% विद्यार्थ्यांनी बरोबर सांगितला आहे 19.3% विद्यार्थ्यांनी मात्र डीएड शिक्षण वैद्यकीय शिक्षण या पर्यायाला पसंती देऊन चुकीची उत्तरे दिली आहेत.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार महाविद्यालयातील पहिले वर्ष पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांना ...........मिळेल.

470 responses




13) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार महाविद्यालयातील पहिले वर्ष पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र मिळेल असे बरोबर उत्तर 81.7% विद्यार्थ्यांनी दिली आहे तर 18.3% विद्यार्थ्यांनी चुकीचे पर्याय निवडले आहेत.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार महाविद्यालयातील दुसरे शैक्षणिक वर्ष पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांना ............. मिळेल.

470 responses




14)राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार महाविद्यालयातील दुसरे शैक्षणिक वर्ष पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांना पदविका मिळेल असे बरोबर उत्तर 62.3% विद्यार्थ्यांनी दिले आहे तर 27.9% विद्यार्थ्यांनी प्रमाणपत्र मिळेल असे चुकीचे उत्तर दिले आहे दोन वर्षानंतर पदवी मिळेल असे चुकीचे उत्तर.9.8% विद्यार्थ्यांनी दिले आहे

तिसरे शैक्षणिक वर्ष पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांना ........ मिळेल .

470 responses




15) तिसरे शैक्षणिक वर्ष पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांना पदवी मिळेल हे बरोबर उत्तर 78.1% विद्यार्थ्यांनी दिले आहे 22 टक्के विद्यार्थ्यांनी मात्र चुकीचे पर्याय निवडलेले आहेत.




16) नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार महाविद्यालयातील शिक्षणाची चार वर्षे पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांना पीएचडी संशोधनाकडे जाता येईल असे बरोबर उत्तर 63.6% विद्यार्थ्यांनी दिले आहे 34.9% विद्यार्थ्यांनी पदव्युत्तर शिक्षणाकडे जाता येईल असे उत्तर लिहिलेले आहे .




17) भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आहेत असे बरोबर उत्तर .86.5% विद्यार्थ्यांनी दिले आहे प्रतिभाताई पाटील या चुकीच्या पर्यायास 9.6% विद्यार्थ्यांनी पसंती दिली आहे.




18) भारताचे सध्याचे शिक्षण मंत्री हे धर्मेंद्र प्रधान आहेत असे बरोबर उत्तर 67.7 % विद्यार्थ्यांनी दिले आहे हे उत्तर बरोबर आहे स्मृती इराणी व निर्मला सीतारामन या चुकीच्या पर्यायास 14.5% व 17.9% अशी चुकीची पसंती दिलेली आहे.




19) नव्या शैक्षणिक धोरण 2020 मधील एबीसी चा फुल फॉर्म सांगा असा प्रश्न विचारला होता त्याचे बरोबर उत्तर अकॅडमीक बँक क्रिडीट सिस्टिम असे बरोबर उत्तर 65.7% विद्यार्थ्यांनी दिले आहे मात्र .34.3% विद्यार्थ्यांना अजूनही अकॅडमी बँक क्रेडिट बद्दल माहिती नाही .




20)नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार देशात वाचन संस्कृतीस प्रोत्साहन देण्यात आले आहे या प्रश्नाचे बरोबर उत्तर 82.6% विद्यार्थ्यांनी दिली आहे मात्र .17.4% विद्यार्थ्यांनी धार्मिक संस्कृती सामाजिक सांस्कृतिक हे हे चुकीचे पर्याय निवडून चुकीचे उत्तरे दिलेली आहेत.

गुगल फॉर्मच्या माध्यमातून 470 विद्यार्थ्यांनी जो प्रश्नावलीस प्रतिसाद दिला होतात्याचे वरील प्रमाणे . त आलेले आहेतविश्लेषण सदर संशोधकाने केले आहे त्या आधारे पुढील प्रमाणे निष्कर्ष मांडण्या.

**निष्कर्ष**

1)1986 च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या जागी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 हे लागू झाल्याची माहिती 96 टक्के विद्यार्थ्यांनी बरोबर दिलेली आहे.

2) डॉ. के. कस्तुरीरंगण आयोगाने केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयास राष्ट्रीय शिक्षण धोरणाचा अहवाल सादर केल्याची माहिती बहुतांश विद्यार्थ्यांनी 90.60% बरोबर दिली आहे.

3)83 % विद्यार्थ्यांना नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील 5+3+3+4 हे प्रारूप माहिती आहे. या नवीन प्रारूपाची 17 % विद्यार्थ्यांना माहिती करून देण्याची गरज मात्र आहे.

4) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 हे केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने 29 जुलै 2020 रोजी लागू केल्याचे बहुतांशी विद्यार्थ्यांना माहिती आहे.

5) 93.4% विद्यार्थ्यांना 34 वर्षांनंतर हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण लागू झाल्याचे माहिती आहे.

6)96% विद्यार्थ्यांना नवीन धोरणात प्राथमिक शिक्षण ते उच्च शिक्षण आणि व्यावसायिक शिक्षण बाबतचे मार्गदर्शन करण्यात आल्याची माहिती आहे.

7) भारतीय शिक्षण व्यवस्थेत अमुलाग्र बदल करणे हे या धोरणाचे उद्दिष्ट असल्याचे 88.4% विद्यार्थ्यांनी बरोबर सांगितलेले आहे.

8) राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी पदवी स्तरावरील प्रथम वर्षात 2022-23 पासून झाल्याचे बरोबर उत्तर 74.6% विद्यार्थ्यांनी दिली आहे तर 25.4% विद्यार्थ्यांनी या धोरणाची अंमलबजावणी पदवी स्तरावर नेमकी कधी झाली हे माहीत नसल्याचे यावरून दिसते.

9)कोरोना महामारीच्या काळात ऑनलाईन शिक्षणावर भर दिल्याचे बहुतांशी विद्यार्थ्यांनी 97% विद्यार्थ्यांनी बरोबर सांगितले आहे.

10) 81.3% विद्यार्थ्यांनी एनइपी चा फुल फॉर्म बरोबर सांगितलेला आहे.

11) केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाचे नामकरण आता शिक्षण मंत्रालय असे झाले आहे याचे बरोबर उत्तर 80 टक्के विद्यार्थ्यांनी दिले आहे. 20% विद्यार्थ्यांना मात्र अजूनही शिक्षण मंत्रालयाबद्दल माहिती नाही.

12) शिक्षणाच्या नव्या प्रारूपामधील चार वर्ष म्हणजे पदवी शिक्षण हे 81.7% विद्यार्थ्यांनी बरोबर सांगितले आहे.

13) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार महाविद्यालयातील पहिले वर्ष पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र मिळेल हे बरोबर उत्तर 81.7% विद्यार्थ्यांनी दिली आहे.

14) दुसरे वर्ष पूर्ण झाल्यानंतर आपणाला पदवी मिळेल हे 62.3% विद्यार्थ्यांना माहिती आहे. मात्र 38 टक्के विद्यार्थ्यांना दुसऱ्या वर्षानंतर नेमके काय मिळणार आहे याबद्दल माहिती नाही त्यांना माहिती करून देण्याची गरज आहे.

15) तिसरे शैक्षणिक वर्ष पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांना पदवी मिळेल हे बरोबर उत्तर 78.1% विद्यार्थ्यांनी दिली आहे मात्र बावीस टक्के विद्यार्थ्यांना वाटते की आपल्याला पदविका अथवा प्रमाणपत्र मिळेल हे चुकीचे आहे याबद्दलही विद्यार्थ्यांच्या मध्ये आणखी जाणीव जागृती गरज आहे.

16) नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार महाविद्यालयातील शिक्षणाची चार वर्षे पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांना पीएच.डी. संशोधनाकडे जाता येईल हे 63.6% विद्यार्थ्यांना माहिती आहे. त्यामुळे भविष्यात पीएच.डी. संशोधनाकडे विद्यार्थ्यांचा अधिक ओढा राहील.

17) सध्याच्या भारताच्या राष्ट्रपती ह्या द्रोपदी मुर्मू आहेत हे 86.5% विद्यार्थ्यांना माहिती आहे.

18) भारताचे सध्याचे शिक्षण मंत्री हे धर्मेंद्र प्रधान आहेत याची कल्पना 67.7% विद्यार्थ्यांना आहे. मात्र ते 30 टक्के विद्यार्थ्यांना भारताचे शिक्षणमंत्री कोण आहेत हे माहिती नाही.

19) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मधील ए बी सी चा फुल फॉर्म हा अकॅडमीक बँक क्रेडिट आहे हे 65.7% विद्यार्थ्यांना माहिती आहे. मात्र 35% विद्यार्थ्यांच्या मध्ये अजूनही एबीसी म्हणजे अकॅडमिक बँक क्रेडिट याबद्दल जनजागृती करण्याची गरज आहे .

20)नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार देशात वाचन संस्कृती प्रोत्साहन देण्यात आल्याचे 82.6% विद्यार्थ्यांना माहिती आहे. त्यांनी बरोबर उत्तर दिलेल आहे. मात्र 17.4% विद्यार्थ्यांना अजूनही याबद्दल माहिती नाही. त्यांनी धार्मिक संस्कृती व सामाजिक संस्कृती हे चुकीचे पर्याय निवडून चुकीची उत्तरे दिलेली आहेत.

वरील सर्व निष्कर्षाचा सारांश असा सांगतो की विद्यार्थ्यांच्या मध्ये अजूनही राष्ट्रीय शैक्षणिक धोरण धोरण 2020 याबद्दल जाणीव जागृतीची गरज आहे. विविध माध्यमातून ही जाणीव जागृती होणे गरजेचे आहे.

**शिफारशी**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 आणि उच्च शिक्षण याबाबत विद्यार्थ्यांच्याकडून मिळालेल्या प्रतिसादाच्या आधारे वरील प्रमाणे माहितीचे विश्लेषण करून निष्कर्ष मांडलेले आहेत. या निष्कर्षाच्या आधारे पुढीलप्रमाणे संशोधकांन काही शिफारशी सुचवल्या आहेत.

1) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 व उच्च शिक्षण याबाबत साधारण 25 ते 35 % विद्यार्थ्यांच्यात अजूनही अज्ञान आहे. त्यांच्यामध्ये जाणीव जागृती वाढवणे गरजेचे आहे. या अनुषंगाने विविध माध्यमातून प्रयत्न होणे गरजेचे आहे यासाठी व्याख्याने, चर्चासत्र ,सेमिनार, कार्यशाळा होणे गरजेचे आहे व्हाट्सअप टेलीग्राम ग्रुप ,इंटरनेट, ईमेल व इतर साधनांच्या माध्यमातून त्यांच्यापर्यंत या शैक्षणिक धोरणाची माहिती पोहोचवणे गरजेचे आहे

2) गुगल फॉर्मच्या माध्यमातून या विद्यार्थ्यांच्या कडून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाबाबत सतत माहिती जाणून घेणे व विद्यार्थ्यांच्या मध्ये विविध माध्यमातून प्रबोधन करणे आवश्यक वाटते.

3) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण व उच्च शिक्षण याबाबत सतत संशोधन होणे ही तितकेच गरजेचे आहे या अनुषंगाने विविध विषयावर संशोधन व्हावेसे वाटते.

**संदर्भ:-**

1.मानकर सुधाकर, (2022) उच्च शिक्षण विषयक नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण. 2020 अतुल पब्लिकेशन कोल्हापूर.

2. नाईक,बी. एम.,(2023)नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०चे अंतरंग.विद्या बुक्स औरंगाबाद

3.सिंग के. के. (2022)ग्रंथालय व माहिती अधिकारी. ग्रंथालय आणि माहिती केंद्र. कुटुंब कल्याण मंत्रालय गाजियाबाद.उत्तर प्रदेश

4.मनुष्यबळ विकास मंत्रालय ,भारत सरकार. एन. ए .पी. 2020 चा रिपोर्ट.

5.जगाच्या स्पर्धेत शिक्षण –दैनिक तरूण भारत आग्रलेख पान नंबर -४ दिनांक-२४/११/२०२२

6.रांजणकर निखिल, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०.-मिळून साऱ्याजनी डिसेंबर २०२२.

7.धनेश्वर अनिल, नव्या शिक्षण प्रवाहाकडे जाताना.- दैनिक सकाळ दिनांक-१७/१२/२०२२.

8.पाटील पांडुरंग बाळकृष्ण,(२०२३).नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा ग्रंथालयावरील प्रभाव. MUCLA, Proceedings of National Conference on National Education Policy and Libraries.P.N.85 to 91

# Reform in Education Sector and Indian Democracy

**1. S. G. Patil**
Assistant teacher,
Shantiniketan Vidyamandir, Sangli
**2. N. A. Patel**
Assistant professor,
Vivekanand College, Kolhapur.
**3. Dr. V. P. Shikhare**
Professor, College of Education,
Barshi.

**Abstract:**

Democracy is a form of government in which people either directly or indirectly participate in the decision-making process of the governing bodies. The largest democracy in the world is thought to be in India. However, talking about modern India, Numerous difficulties have been faced by democracy, including social and economic inequality, unemployment andpoverty, illiteracy, communalism, corruption, terrorism, and population growth. (Sahu-2020.) The present paper focuses on illiteracy as a challenge to Indian democracy.

Education is integral to the development of every community and culture which forms a democratic nation. Literacy is very important for the success of every country. However, in the case of India, removing literacy persists as a challenge alongside some key areas like foundational literacy and numeracy, teachers' capacity building, school-to-work transition, and connecting the unconnected that require intervention. The paper attempts to opine that, the implementation of a National Education Policy, Experiential Learning Approach, Education- Employment Corridor, and Reducing the Language Barrier, etc. can and should happen in a republic country. The argument in the conclusion is that, despite the difficulty, daily quality improvements are possible if one has the motivation. However, we are still missing quality education as expected. To improve the quality of education the concerned experts have to think about the parameters of quality education.

**Key Words:** Democracy, Integral, republic, Literacy, inequalities, Employment etc.

**Introduction:**

Developing countries have always given priority to quality education and India is no exception. On the other hand, the concept of quality education has gained attention these days, as everyone has become aware of education, including students, parents, communities, teachers, leaders, and nations, who agree that the matter and method of education are as important as access to education. Statistically speaking, what most people understand as qualityof e-education; is much simpler than the actual crux of the subject. At the beginning of the 21century, when education was understood as more than reading, writing, and arithmetic and as explained at the World Conference on Education, there was a need to broaden the vision ofeducation for all. (Jomtien, 1990) and declare at the WEF (World Education Forum) (Dakar, 2000). A broader definition of quality education is evolving and is being directly linked to critical elements such as literacy, numeracy, life skills, teachers, content, competency, methods, curricula, examination systems, policy, planning, management, and administration. The following stand as justifications for the mention of some of the terms mentioned above:

1. Curriculum: Capacity building curriculum, FLN (Foundational Literacy and Numeracy)/ Competency-based education,
2. Content: content standards, content lifecycle management, content translation andcontextualization.
3. Capacity: Competency framework training needs analysis and Training dissemination.
4. Community: Volunteering, crowdsourcing, self-sustainability.
5. Digital: Devices and hardware connectivity solutions Data.

**Objectives:**

The present research aims to meet the following objectives:

1. To study the issues faced by the education sector in India.
2. To study the interrelation and effect of these issues on democracy.
3. To discuss methods to overcome the said issues.
4. To elaborate on the role of democracy in overcoming them.

**Explanation of the subject:**

The NEP 2020 of India aims to enhance the provision of high-quality education for all students, through digital means. The NEP 2020 is in line with the objectives of education in the twenty-first century, from reforming the educational system to developing a strong digital learning system. It emphasizes the development of the innovative capacity of every toddler (World economic forum). This research paper tries to establish that these things can and should happen in a republic country. Literacy is a very important aspect of the success of every country. However, statistically speaking, India still faces a challenge in the removal of illiteracy. The conclusion argues that while the challenge seems insurmountable, quality improvements are attainable on a daily basis if there is the will.

**Findings:**

1. Important issues affecting India's education sector:

¬ High Dropout Rate:

Every year, a large number of students drop out of school worldwide. This hinders theireconomic and social well-being in addition to reducing the literacy rate of the country and creating a non-progressive environment. Economic conditions, lack of interest, engagement in domestic work, the poor density of educational institutes, inability to cope up, marriage, and many more.

¬ Infrastructure in Schools:

In schools located in rural areas, a lack of resources can occasionally result in poor infrastructure. Buildings lack infrastructures which include benches, playgrounds, laboratories, or lavatories. From time to time, with the negative density of tutorial institutions, transportation is a mission, and lack of connectivity often effects in negative enrolment and/or early dropouts. Subsequently, due to the number of dropouts increasing the amount of literate human resources supplied to the nation is decreasing. Illiteracy caused due to lack of infrastructure thus challenges the credibility and structure of the democracy.

¬ Problem of Brain Drain:

Due to cutthroat competition for getting admission in top institutes may be challenging academic environment is created for a large number of students in India, So that they decide on going overseas, which makes the use of a disadvantaged of accurate expertise. There is definitely a quantitative growth of schooling in India however the

qualitative front important for a student to get a process is lagging at the back. With most of the skilled human resources lost to other countries of the world, does the Indian economy and standard of productivity takea hit and the stability of the democracy.

¬ Mass illiteracy:

The trouble of illiteracy in India is a matter of high-quality challenge. Regardless of the truth that the country has made exceptional strides in schooling, the literacy charge remains very low. Reasons for Illiteracy in India can be less-educated parents, poverty, population, backward thinking, etc. However, these reasons are not without solutions which include: free education, awareness, and grants. One must realize that only a nation with the most stable democracy could come up with solutions that would do this problem rightfully justice.

¬ Lack of Adequate Attention to Indian Languages:

Indian languages are still in an underdeveloped stage, the medium of due to learning mainly in higher secondary and above instructions for technological know-how subjects is English, ensuing in unequal possibilities for rural students. Additionally, trendy guides are notavailable in the Indian language. A democratic system and a democratic vote would not only throw light upon the problems faced by students educated in a vernacular medium when copingwith English as a medium of instruction.

¬ Lack of Technical and Vocational Education:

Mainly, our educational system is of a generalist nature. Improvement of technical and vocational schooling is quite unsatisfactory, because of which the wide variety of educated unemployed individuals is growing day by day. Mainstream education, while sound, fails to provide for all students as the population of the country is too high with respect to the availability of employment. A democratic vote to bring forth this issue would highlight the need of the hour, hence, availing better vocational and technical courses and a better validity and credibility for the same.

¬ Unaffordability:

Meager incomes at the rural level lead to education taking a backseat. Because of a lackof understanding and financial stability, many dads and moms have a tendency to peer trainingas a fee rather than funding. They might alternatively need their children to work and earn. Moreover, when it comes to higher education, the lack of good institutes in the vicinity forces students to shift to cities, which adds to their expenses. This leads to low

rates of enrolment. A democratic state would allow the plight of rural residents regarding the availability and affordability of education to be brought to the center stage, availing them of apt recognition and a possible solution.

¬ Gender-Inequality:

Despite the authorities' attempt to make sure equality of opportunity for education foreach people in our society, the literacy rate of women in India, mainly in rural regions, still remains very low. According to the UNICEF (United Nations Children's Fund), poverty and local cultural practices like, early marriage, dowry, and female infanticide play a big role in gender inequality in education all over India. It is only through a state adopting democracy canwe ensure that the problems of women and their deprivation from the right to education can bebrought to light.

¬ Lack of sanitation:

Another obstacle to education is a lack of sanitation in schools across the country. Thetoilets of most schools lack proper and regular turns of sanitation as do the classrooms lack regular maintenance. The availability of a clean and hygienic washroom is but a basic necessityfor an educational institution to be viable. The above-mentioned issues prove to be a threat to democracy as not only do they affect the manpower but also affect the efficiency of the work done within the country.

1. Transforming the education sector:

The Education 4.0 India initiative builds on efforts by means of the important countrygovernments and leverages their interventions. The interventions recommended by the initiative can create a tremendous impact on making education more accessible and inclusive to the democratic nation. It can only be made possible by addressing the following:

1. Improving Infrastructure in Schools;
2. Reducing High Dropout by Rate Making Learning Relevant and Developing a Community Plan;
3. Reducing the Problem of Brain Drain by making quality jobs in our country;
4. Mass illiteracy can be reduced by trying some way like providing free education inschools and universities the government;

5. Spreading awareness about the importance of education;
6. Offering grants as scholarships and zero-interest loans to students;
7. Institutions and educational organizations should try to create more digital platforms toteach reducing the Language Barrier;
8. Lack of platform technical and vocational Education; and
9. Enhancing getting to know outcomes by way of the usage of greater adaptive studyingstructures and community engagement.

The report presents a roadmap to enhance India's school education ecosystem and gives out a call to action to all stakeholders in the edu-tech space to come together to transform the sector.

3. Easy way to get to it:

¬ Towards Experiential Learning Approach:

There is a need for the inclusion of problem-fixing and selection-making-associated topics inside the college curriculum to offer a finger-on getting-to-know enjoy to college students and put together them to stand the outdoor world when they enter the body of workers. Experiential learning can benefit most from its capacity to compel each student to take an activepart in the learning process, which in turn awakens their emotional intelligence and puts them on a path toward self-learning. Linking artificial intelligence with the academic sector may even facilitate experiential getting to know this would not only ready the human resource walking in to join the workforce for theoretical and practical problems they could encounter.

¬ Implementation of NEP (2020):

The implementation of the NEP can help shake the education system from its slumber Moving away from the current 10+2 system to a 5+3+3+4 system will carry the preschool age group officially into the education set-up. This avails the centralization of the education system down to the very formative years of the learners ensuring that the learners start their process offormal education at an equivalent baseline.

¬ Education-Employment Corridor:

India's educational setup needs to be enhanced by integrating vocational learning with mainstream education and providing the right mentorship at school (especially in government schools) to ensure that students are guided in the right direction from the

beginning and are aware of career opportunities. Many students in rural areas have high-quality abilities and are influenced to study however lack the proper mentoring. This is required for the students and for their mothers and father to be able to in a manner also lessen the gender hole in education.

- Reducing the Language Barrier:

While retaining English as a means of schooling for global understanding (EIU), it's miles vital to provide different Indian languages the same significance, and special publication agencies can be hooked up to translate resources into a spread of languages so that every Indian student has an identical opportunity irrespective of their linguistic heritage. This increases not only the availability of resources but also boosts the scope of reference books and their application.

- Taking a Note from Past to Future:

It is critical to look to destiny whilst keeping our lengthy-hooked-up roots in thoughts. There's a good buy to examine from the 'Gurukul' system of historical India, which focussed on the holistic development of past lecturers, centuries earlier than the topic became a buzzword in cutting-edge-day education. Ethics and cost schooling in school remained at the centre of studying within the historical Indian education device. Values inclusive of self- reliance, empathy, creativity, and integrity remain a primary area from ancient India that holds relevance even these days. The ancient evaluation of education became no longer constrained to grading thematic knowledge. Students were assessed on the talents they found and how properly they can observe realistic expertise to real-lifestyle situations. The modern education system can also devise similar systems of assessment ensuring that the human resource leaving the education systems as prospective manpower for the future of India are ready both emotionally and theoretically to tackle the issues the world might throw at them.

4. Keys areas that require intervention:

By taking a glance it identified four focus areas for interventions: teachers' capacity building, school-to-work transition, and connecting the unconnected and foundational numeracy and literacy (FLN). It is categorized under five building blocks, namely: digital literacy, capacity, content, curriculum, and community.

- Foundational literacy and numeracy:

To give example, in FLN, a major gap identified is the lack of "byte-sized" content

in early learning that can ignite a child's interest, and engage parents who may not be educated. Some digital tools like examine-aloud, storytelling, interactive content material, flip books, and the usage of the net can deal with these demanding situations. FLN solutions are centered on the following standards: the capability of the answer to interplay with the house surroundings and the relevant participants; the adaptability of the answer; as a way to reach parents and groups inside the remotest and most resource-challenged places. Garnering attention from both the learner and the learner's parents would not only bring about the importance of education but also assure the parents about the substantiality of the topics studied.

- Teachers' capacity building:

Improving teachers' capability to supply education in more modern codecs is important, as is their buy-in and involvement in creating and presenting tech-enabled curricula. To strengthen teachers' capacity building by improving the quality of teachers' training, linking training with career progression, and involving teachers in designing capacity-building programs.

- School-to-work transition:

School-to-painting transition is also vital as specializes in making college students task-equipped in an unexpectedly evolving employment landscape. A higher percentage of Indian schools still don't include vocational education in their curricula. Students can increase their skill levels and find jobs that are a good fit for them by using digital and hybrid models.

- Connecting the unconnected:

The worldwide pandemic has no longer best made digital learning significant to teaching worldwide, it has additionally widened the virtual divide, leaving those without gadgets and internet connections further in the back. By the UDISE system survey in 2020-21, 41.3% of schools have computers, and 24.5% had internet. This implies the need for interventions to help schools at every level connect more effectively. It should always act in maintaining the true spirit of democracy & amp; try to keep pace with the changing situation of the country. These methods of combating the problems might seem difficult to implement but are not impossible considering the leaps and bounds that India has made regarding various different policies. Not only are the issues a threat to democracy but also only democracy is a hope for a probable solution.

**Conclusion:**

From the above discussion, it can be said that though India is considered one of the largest democracies in the world, in practice, there are various emerging challenges or issues that are responsible for creating obstacles in the smooth functioning of the democratic republic of India. However, it is a matter of discussion that despite the elapse of seventy-two years of independence since 1947 in India, there is one most important issue that is illiteracy, which threatens the backbone of democratic governance. In the modern world, this problem is not impossible to remove. Those problems may be solved with the aid of the cooperation of the people. We know the importance of quality education. It directly affects all aspects of the growth of a country and helps the country to stand high in the overall platform. In India duringthe eras of seventy years, higher education has developed a lot in terms of quantity. However, we are still missing quality education as expected. To improve the quality of education the concerned experts have to think about the parameters (such as enough infrastructure, updated curriculum, skilled faculties, learning resources, financial help, and well-planned guidelines) of quality education.

**References:**

1. Education, skills and learning: here are four interventions that can make education In India more accessible. (2022, Oct 7). World Economic Forum.
2. Jomtien. (1990). World Declaration on Education For All. ECLAC, (pp. 1-6).Thailand.
3. Role of School Infrastructure In Bringing Quality Education. (2022, Jan 28). SCHGAL FOUNDATION.
4. Sahu, M. (2020). The working of democracy in India: Problems and prospects. International Journal of Humanities and Social Science Research, 6(3), 1-4.
5. The Unified District Information System for Education (UDISE) Survey. (2020-2021).
6. UNESCO. (2015). Education for all 2000-2015: Achievements and Challenges.HEART ( High Quality Assistance for Results). UNESCO.
7. UNESCO.Executive Board. (2003). Promoting quality education: education forpeace, human rights and democracy; education for sustainable Development; curricula, educational tools and teacher training. 311.

# "भारतीय लोकशाही राजकीय व्यवस्था - एक आढावा"

**प्रा. वर्षा मुरलीधर पोतदार**
सहा. प्राध्यापक व राज्यशास्त्र विभागप्रमुख,
श्रीमती आक्काताई रामगोंडा पाटील कन्या
महाविद्यालय, इचलकरंजी
Mob. No. - 7798665969

**सारांश:**

आज लोकशाही जगात सर्वात लोकप्रिय अशी राजकीय संकल्पना आहे. आंतरराष्ट्रीय समूदायातील अर्ध्याहून अधिक राष्ट्रांनी लोकशाही व्यवस्थेचा स्वीकार केलेला आहे. लोकशाही शासन प्रणाली ही अत्यंत जुनी व विकसीत होत गेलेली शासनप्रणाली आहे. काळानुसार अनेक स्थित्यंतरे येत गेली, त्यामुळे लोकशाहीची वाटचाल कमी अधिक वेगाने झालेली दिसून येते. प्राचीन काळापासून समाजजीवनात लोकशाहीचे अस्तित्व दिसून येते. राष्ट्रराज्यांच्या उदयानंतर अनेक राष्ट्रांनी लोकशाहीचा स्वीकार केला. परंतु तिची परिभाषा आपल्या सोयीनुसार बदलण्याचा प्रयत्न अनेक राष्ट्रांनी केलेला आहे. भारत स्वतंत्र झाल्यानंतर आपण देखील संसदीय लोकशाही राजकीय व्यवस्थेचा स्वीकार केला. जनतेचे सार्वभौमत्त्व मान्य करून अंतिम सत्ता जनतेच्या हाती देण्यात आली आहे. भारतीय संविधानाने जनतेला सार्वभौम मानलेले आहे. त्यानुसार उपयुक्त संसदीय लोकशाही आपण स्वीकृत केलेली आहे. गेल्या ७० - ७२ वर्षांच्या भारतीय राजकारण, समाजकारणाचा तसेच अर्थकारणाचा आढावा घेतला तर त्यातून आपल्या भारतीय लोकशाहीची वाटचाल कोणकोणत्या पद्धतीने झाली हे समजून येते. प्रस्तुत शोधनिबंधाच्या माध्यमातून संशोधकाने भारतीय लोकशाही राजकीय व्यवस्थेचा प्राचीन, मध्ययुगीन, आधुनिक तसेच भविष्यकालीन विकास व वाटचालीचा थोडक्यात आढावा घेतलेला आहे.

**पारिभाषिक शब्द:** गणराज्य, राज्यक्रांती, राजेशाही, सरंजामशाही, भारतीय लोकशाही, लोकशाही उठाव इत्यादी.

**प्रस्तावना :**

अथेन्सच्या नगरराज्यापासून लोकशाहीची संकल्पना मांडली जात असली तरी त्यावेळी ती फार संकुचित होती. त्यात तुलनेने अल्पसंख्यांक असलेल्या नागरिकांनाच फक्त राजकीय अधिकार होते. स्त्रिया व गुलाम ही बहुसंख्यांक माणसे त्या अधिकारापासून वंचित होती. त्यामुळे खरा लोकशाही विचार १७ व्या शतकापासून सुरू झाला असे मानले जाते. इ.सन ५ ते १५ हा कालखंड राजेशाही व उमरावशाहीचा कालखंड होता. या काळात इंग्लंडच्या जनतेने राजाकडून नागरी हक्कांची सनद मिळवली, तिला 'मॅग्नाचार्टा' म्हणतात. हा आधुनिक लोकशाहीचा पहिला टप्पा मानला जातो. इंग्लंडमधील रक्तविहीन क्रांती (१६८८), अमेरिकन राज्यक्रांती (१७७६) आणि फ्रान्सची राज्यक्रांती (१७८९) या तीन महत्त्वपूर्ण राज्यक्रांतींचा परिणाम म्हणजे न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता या उदारमतवादी मूल्यांचा प्रसार व स्विकार जगाने केला. यातूनच लोकशाही संकल्पनेचे पोषण झाले. औद्योगिक क्रांतीनंतर लोकशाही विचारांच्या विकासाचा दुसरा टप्पा सुरू झाला. नागरी अधिकारांबरोबरच शिक्षणाचा, मताधिकाराचा हक्क मिळवण्यात नागरिकांना यश मिळाले. वसाहतवादातून मुक्तता मिळवण्यासाठी उभारण्यात आलेल्या स्वातंत्र्याच्या चळवळी या लोकशाहीच्या द्योतकच होत्या. ब्रिटीशांच्या गुलामगिरीतून भारताला १५ ऑगस्ट, १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले आणि भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीने आपण प्रजासत्ताक बनून लोकशाही राजकीय व्यवस्थेचा स्विकार केला. लोकशाही व्यवस्था हा भारतीय समाजजीवनाचा अविभाज्य भाग बनला.

भारत जेव्हा स्वतंत्र झाला, तेव्हा त्याबरोबर अनेक देश स्वतंत्र झाले. यामध्ये भारताएवढा विशाल, अनेक प्रकारची विविधता असलेला व रूढ अर्थाने लोकशाहीची परंपरा नसणारा असा एकही देश नव्हता. तरीही भारतात लोकशाही टिकली, तिची

पाळेमुळे रुजली, सर्व सत्तांतरे शांततामय मार्गाने झाली. भारताला स्वातंत्र्य मिळत असताना ज्या शंकाकुशंका मनात होत्या, त्या प्रत्यक्षात आल्या नाहीत. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे आधुनिक लोकशाहीला पोषक अशी आवश्यक मूल्ये फाळणीनंतर उर्वरित भारतात अस्तित्वात होती. १४ ऑगस्ट १९४७ पूर्वी भारताचाच एक भाग असलेल्या पाकिस्तानला धर्म एक असूनही आपले ऐक्य टिकविता आले नाही व बांगलादेश पाकिस्तानपासून स्वतंत्र झाल्यावरही पाकिस्तानला आपली लोकशाही टिकविता आली नाही. अगदी प्राचीन काळातही गणराज्यांची मोठी परंपरा भारतात होती. त्यानंतरही गावागावात जात पंचायतीद्वारा जे निर्णय घेतले जात, त्यात सर्व जातींच्या पंचांचा समावेश असे व सर्वांच्या सहमतीने निर्णय झाला पाहिजे याचा आग्रह असे. त्याचबरोबर कालानुसार धर्म, रूढी, परंपरा यांत बदल घडवून आणण्याची मोठी परंपरा हिंदू संस्कृतीला लाभली आहे. त्यामुळेच कर्मकांडापेक्षा ‘मानवता’ या मूल्याला हिंदू मानसात अधिक प्रतिष्ठा मिळाली आहे. लोकशाही टिकण्यासाठी मानवता या मूल्याचे अधिष्ठान असावे लागते. भारतीय लोकशाही राजकीय व्यवस्था ही जगातील एक यशस्वी राजकीय व्यवस्था म्हणून ओळखली जाते. जरी भारतात अगदी प्राचीन काळापासून लोकशाहीचे अस्तित्व दिसून येत असले तरी, स्वातंत्र्यानंतर ज्या पिढीच्या हातात राज्यकारभाराची सूत्रे जाणार होती; त्या पिढीला ब्रिटीशकालीन काय तो लोकशाही राज्यप्रणालीचा अनुभव होता. एवढ्या मोठ्या लोकसंखेच्या, बहुभाषिक, बहुधार्मिक व बहुसांस्कृतिक असणाऱ्या भारतामध्ये दुसऱ्या कोणत्याही शासन पद्धती कुचकामी ठरल्या असत्या हे घटनाकारांनी चांगले ओळखले होते. अनेक पाश्चात्त्य विचारवंत तसेच अधिकाऱ्यांनीही भारतीय लोकशाहीच्या वाटचालीबद्दल साशंकता व्यक्त केली होती. परंतु १९५० पासून ते आजपर्यंत आपल्या राजकीय व शासकीय कार्यभाराचा आढावा घेतला असता हे लक्षात येईल की, भारतासाठी लोकशाही राजकीय व्यवस्थाच अधिक उपयुक्त ठरलेली आहे व इथून पुढेही ठरणार आहे.

**उद्दिष्टे:**

१. लोकशाही राजकीय व्यवस्थेचा पूर्वइतिहास अभ्यासणे

२. भारतातील लोकशाही राजकीय व्यवस्थेचा स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील वाटचालीचा आढावा घेणे

३. भारतीय लोकशाहीची सद्यस्थिती अभ्यासणे

४. भविष्यातील भारतीय लोकशाही राजकीय व्यवस्थेच्या वाटचालीची दिशा अभ्यासणे.

**विषय विश्लेषण:**

भारतीय लोकशाही व्यवस्था ही केवळ एक राजकीय व्यवस्था नाही तर ती समस्त भारतीय नागरिकांची जीवनपद्धती आहे. त्यामुळे भारतीय लोकशाहीचा विकास हा प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक काळात कोणत्या पद्धतीने झाला किंवा होत आहे याचा आढावा घेतला असता तिच्या दीर्घकालीन स्थिरतेची मीमांसा करणे सोपे होईल. प्राचीन काळातील प्रजासत्ताक शासनाला ‘गण’ किंवा गणराज्य अशी संज्ञा वापरत. गणराज्य म्हणजे गणाच्या हुकूमाखालील शासनसंस्था. गण म्हणजे विशिष्ट भूप्रदेशातील सर्व लोकांचा संघ. गणातील सर्व लोकांसाठी व त्या सर्वांच्या निवडीने चालणारे जे राज्य ते गणराज्य. गणराज्यात कोणत्याही एका व्यक्तीच्या हाती सत्ता केंदीत न होता ती ‘गण’ किंवा गटाच्या हाती असे. भारतातील गणराज्याचा उदय इ.स.पू. ७०० मध्ये झाला असण्याची व ते इ. स. ४०० पर्यंत (११०० वर्ष) अस्तित्वात असण्याची नोंद आढळते. इ. स. पु. चौथ्या शतकात अलेक्झांडरच्या स्वारीच्या वेळी त्याला अनेक भारतीय गणराज्यांशी युद्ध करावे लागल्याचे इतिहासात दिसून येते. भारतात अस्तित्वात असलेली तत्कालीन प्राचीन गणराज्ये म्हणजे आधुनिक लोकशाहीचेच रूप होय. भारतातील प्राचीन गणराज्यांसंबंधी वैदिक काळातील ऋग्वेद व इतर वैदिक साहित्यात तसेच रामायण, महाभारत, शांतीपर्व, शुकनीतीसार, मनुस्मृती, नारदस्मृती, पाणिनीची अष्टाध्यायी पुराणे, पतंजली, समुद्रगुप्ताच्या हरिषेण प्रशस्ती, बुद्धकालिन जातक कथा, परकीय ग्रीक लिखाण, कौटिलीय अर्थशास्त्र, जैन धर्मग्रंथ, बौद्ध वाङ् मय, दक्षिण भारतात सापडलेले तसेच अशोकाचे शिलालेख, मौर्यकालीन व मुघलकालिन साहित्य इत्यादीतून माहिती मिळते. रामायण काळात अयोध्येच्या शेजारी जनक राजाचे ‘विदेह’ हे गणराज्य सुप्रसिद्ध होते. द्वारकेचा भारतप्रसिद्ध राजा श्रीकृष्ण

हा अंधक वृष्णी गणराज्याच्या वंशातील होता. महात्मा गौतम बुद्धाचा जन्म प्रसिद्ध अशा 'कपिलवस्तू' गणराज्यात झाला होता. तर भगवान महावीर हे, 'मल्ल' संघराज्याचे (पावा) निवासी होते. मेगॅस्थिनिसने भारतातील काही भागात राजे तर काही भागात लोकनियुक्त अधिकारी असल्याचे म्हंटले आहे. इसवी सनाच्या पाचव्या शतकानंतर गणराज्यांचा ऱ्हास होऊ लागला. तो थांबविण्याचा प्रयत्न अनेकांनी केलेला दिसून येतो. बुद्धांच्या मते, 'गणराज्य पद्धतीचा शासन कारभार सभा, सर्वानुमते निर्णय, परंपरागत संकेतांचे पालन, वयोवृद्ध व स्त्रिया यांना आदराची वागणूक तसेच मंदिरांच्या पावित्र्याचे रक्षण जोपर्यंत होत राहील तोपर्यंत गणराज्याला जिंकता येणार नाही.' परंतु अंतर्गत कलह, फुटीरवृत्ती, राजसत्तेचा घडून आलेला विकास, शक्तीशाली राज्यांची आक्रमणे यामुळे गणराज्यांचे स्वरूप नष्ट होण्यास सुरुवात झाली.

प्राचीन भारतात मध्ययुगाच्या प्रारंभी म्हणजे ११ व्या शतकापासून ते १६ व्या शतकापर्यंत गझनी, घोरी, खिलजी, लोदी इत्यादी तुर्कस्थान, अफगाणिस्थान या देशांतून आलेल्या इस्लामी घराण्यांनी अनेक प्रदेशावर राज्य केल्याची नोंद आढळते. जवळपास पाच शतके त्यांनी राज्यकारभार केला असला तरी ते संपूर्ण भारतावर कधीच वर्चस्व निर्माण करू शकले नाहीत. यापैकी काही शासकांनी आपल्या राज्यकारभाराच्या पद्धतीने स्वतंत्र ओळख निर्माण केल्याचे दिसते. इ.स.१५२६ मध्ये 'बाबर' या मोघल सम्राटाने भारतात बहुतेक प्रदेशावर आपली सत्ता प्रस्थापित केली. त्याच्या काळात विशेष महत्त्वाच्या व्यक्तींना एकत्र करून चर्चेच्या माध्यमातून राज्याचे ध्येय धोरण ठरविण्यात येई. न्यायनिवाडा ते स्वत: लोकांपुढे येऊन करीत. पुढे अकबराच्या काळात 'वजीर' अर्थमंत्र्याचे काम करी. पुढे तेच नाव मुख्यमंत्र्यांना देण्यात आले. काश्मीरमध्ये अजूनही तेथील मुख्यमंत्र्याला 'वजीर-ए-आझम' असे संबोधण्यात येते. मोगल काळात बराचसा कारभार 'मनसबदारी' पद्धतीवर चालत असे. या काळात स्थानिक स्तरावरील प्रशासन स्वतंत्र, विकेंद्रीत तसेच स्वशासित स्वरुपाचे असे. महाराष्ट्रात १७ व्या शतकाच्या मध्ये शिवाजी महाराजांनी स्वतंत्र राज्याची स्थापना केली, मराठ्यांनी १८ व्या शतकात संबंध भारतभर मुलुखगिरी करून अनेक भागावर आपली अधिसत्ता निर्माण केली. तरी या राजवटीला फारसे स्थैर्य नव्हते. अंतर्गत कलह, सतत युद्धे तसेच प्रबळ जहागिरदारी पद्धती इ. चा फायदा परकीय ब्रिटीश सत्तेने घेतला. परिणामी १९ व्या शतकाच्या प्रारंभी ब्रिटिशांनी सर्व भारतावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. मराठी राज्यसभा कलखंडात भारतात लोकशाहीचे मूलभूत तत्त्व असलेली धर्मनिरपेक्षता अस्तित्वात होती. सशक्त व मजबुत मध्यवर्ती सत्ता उभारण्याचे जे मर्म शिवाजी महाराजांना उमगले होते ते त्यांच्या नंतर सत्तेवर आलेल्या कोणत्याही राज्यकर्त्यांना उमजले नाही. भारतातील ब्रिटिशांच्या आगमनाबरोबरच त्यांच्या राज्यविषयक व्यवस्थेबाबत पाश्चिमात्यांच्या अनेक नव्या कल्पना, नवे विचार व पद्धती भारतात आल्या. त्यातूनच 'राज्य लोकांचे असते. लोकांच्या ते उपयोगी ठरले पाहिजे, त्यात लोकांचा जास्तीत जास्त सहभाग असला पाहिजे' या विचारांची भारतीयांमध्ये जाणीव झाली.

ब्रिटीश काळातील भारतात संसदीय लोकशाहीची पायाभरणी करण्यासाठी अनेक कायदे उपयुक्त ठरले. उदा. १८६१ चा प्रथम कौन्सिल कायदा, १८९२ चा दूसरा कौन्सिल कायदा, १९०९ चा मोर्लेमिंटो सुधारणा कायदा, १९१९ चा मॉंट्येग्यू चेम्सफर्ड सुधारणा कायदा, १९३५ चा भारत प्रशासन कायदा, १९४७ चा भारतीय स्वातंत्र्याचा कायदा इत्यादी. २६ जानेवारी, १९५० पासून खऱ्या अर्थाने आपण स्वीकारलेल्या संसदीय लोकशाही राजकीय व्यवस्थेच्या दृष्टीने स्वतंत्र भारताची जडणघडण व्हायला सुरूवात झाली. जगातील लोकशाहीची जननी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ब्रिटनमध्ये देखील लोकशाहीची प्रासंगिकता परिस्थितीसापेक्ष होती. नाहीतर जगात 'उदारमतवादी लोकशाही' देश म्हणून ओळख असणाऱ्या इंग्लंडने हिंदुस्तानला आपली वसाहत बनवून येथील लोकांचे राजकीय, आर्थिक, सामाजिक व कायदेशीर हक्क हिसकावून घेतले नसते. ब्रिटीश भारतात लोकांवरील जुलूम, जबरदस्ती वाढायला लागली, तेव्हा पाश्चात्त्य उदारमतवादी विचारांचा प्रभाव असणाऱ्या तसेच आत्यंतिक राष्ट्रवादाने प्रेरित झालेल्या समाजसुधारक, स्वतंत्र विचारांच्या लोकांनी वृत्तपत्रे, मासिके, पाक्षिके तसेच जाहीर सभांच्या माध्यमातून लोकजागृती घडवण्याच्या प्रयत्न केला. उदा. दर्पण, सुधाकर, विजयी मराठा, केसरी, दिनबंधू, समाजप्रबोधनपत्रिका, हरिजन, यंग इंडिया इत्यादी. तत्कालीन ब्रिटीश सरकारने सरकारविरोधी भूमिका मांडणाऱ्या व लिखाण करणाऱ्या काही वृत्तपत्रांवर बंदी घातलेली होती. यातून

लोकशाहीची त्यांची संकल्पना कशी संकुचित होती हे दिसून येते. ब्रिटीशांना विरोध करणाऱ्या राष्ट्रीय काँग्रेस मध्ये देखील सर्व वर्गातील लोकांचा समावेश नव्हता, अशी टीका सातत्याने होत असते. कारण सामाजिक, आर्थिक व राजकीय भेदाच्या भिंती लोकशाही विकासाच्या आड येत होत्या. त्याकाळी अस्तित्वात असलेल्या चातुर्वर्ण्य पद्धतीमुळे लोकांचा सामाजिक, राजकीय सहभाग अत्यल्प होता.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतासमोर अनेक मोठी आव्हाने उभी होती. सर्वात मोठे आव्हान देश एकसंध ठेवण्याचे होते. भारताच्या इतिहासात, सम्राट अशोकाच्या साम्राज्यानंतर एवढा मोठा भूभाग एका राजकीय व प्रशासकीय सत्तेखाली आला होता. घटनानिर्मिती करताना भारताच्या भविष्याच्या दृष्टीने दोन प्रमुख विचारप्रवाह होते. पहिला विचार केंद्र सामर्थ्यशाली ठेवण्याचा होता, तर दुसरा राज्यांना अधिक अधिकार देण्याचा होता. यामध्ये राज्यघटनेत संतुलन साधण्याचा प्रयत्न केला असला, तरी अंतिम अधिकार केंद्र शासनाकडे दिला व राष्ट्रीय एकात्मतेचा पाया निश्चित केला. कोणत्याही राज्याला या संघराज्यातून फुटून निघण्याचा अधिकार दिला नाही. भारतामध्ये जी विविधता आहे, तिचा आदर व तिचे संरक्षण करीत असताना ती फुटीचे साधन बनणार नाही याची काळजी घेण्यात आली. अधिकाराचे केंद्रीकरण व विकेंद्रीकरण यांत उत्तम संतुलन साधले गेले आहे. दुसरा प्रश्न मताधिकार कोणाला द्यायचा असा होता. लोकशाही विकसित झालेल्या अनेक देशात हा अधिकार टप्प्याटप्प्याने दिला गेला होता. भारतीय राज्यघटनेने मात्र एकवीस वर्षांवरील (आता अठरा वर्षांवरील) सर्वांना मताधिकार दिला. जेव्हा भारत स्वतंत्र झाला, तेव्हा देशात सुशिक्षित वर्गाचे प्रमाण खूपच कमी होते. या दृष्टीने हा निर्णय खूपच धाडसाचा होता. भारतामध्ये विविध प्रकारची सामाजिक विषमता होती. ती दूर करण्याचा प्रयत्न केला नसता, तर ती भविष्यातील असंतोषाचे कारण बनली असती. त्यातून मार्ग काढण्याकरिता आरक्षणासारख्या तरतूदींमधून तिच्यावर व्यवस्थात्मक उत्तरे शोधली गेली. धर्म, जात, परंपरा व भाषा हे समाज संघटनेचे व संघर्षाचेही प्रमुख घटक. यांच्या संबंधांचे स्वरूप काळानुसार बदलत जाते. त्यामुळे त्यांचा सामना करताना दृढता, संवेदनशीलता, नियंत्रण, मोकळीक अशा परस्परविरोधी धोरणांचे संतुलन राखावे लागते. यशस्वी लोकशाहीसाठी राजकीय नेतृत्व, प्रशासन, न्यायव्यवस्था, प्रसारमाध्यमे यांच्या परस्परसंबंधांतून राष्ट्रहित व व्यक्तिस्वातंत्र्य, समाजहित व विशिष्ट समाजगटांचे हितसंबंध यांत समन्वय घडवून आणणे आवश्यक असते. भारताची राज्यघटना करीत असताना १८५७ नंतर ब्रिटिशांनी भारतावर जे राज्य केले, त्याचाच फक्त काय तो अनुभव घटना समितीपाशी होता. स्वतंत्र भारताच्या शासन कर्त्यांच्या अनेक पिढ्यांपाशी देखील एवढे मोठे राज्य चालविण्याचा अनुभव नव्हता, याचा विचार केला तर हे काम ऐतिहासिक किती महत्त्वाचे होते ते लक्षात येते.

लोकशाहीच्या यशासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पंडित जवाहरलाल नेहरू यांनी सारासार विचार करून हिंसेऐवजी निवडणुकीच्या मार्गाने राजकीय सत्तांतर करण्यास अग्रक्रम दिला. त्यांना रक्तपातविरहित राजकीय क्रांती अपेक्षित होती. स्वामी-मालक आणि सेवक, जमीनदार आणि दास, भांडवलदार आणि कामगार, भिक्षुकशाही आणि श्रद्धावान लोक यांच्यातील शोषणाचे संबंध भारतीय राज्यघटनेच्या शिल्पकारांना मान्य नव्हते. त्यांनी लोकशाहीमध्ये व्यक्तीचे स्वातंत्र्य, व्यक्तीची प्रतिष्ठा, व्यक्तीचे मूलभूत हक्क, व्यक्तीचा मताधिकार, व्यक्तीचा निवडणुकीला उभे राहण्याचा हक्क, असे राजकीय हक्क मान्य केले. व्यक्तीच्या राजकीय हक्कांवरील सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, धार्मिक अंकुश काढून टाकण्याचा प्रयत्न केला. या अर्थाने भारतीय राज्यघटना निर्मितीच्या प्रक्रियेमध्ये सरंजामशाही मूल्यव्यवस्थेचा प्रचंड पराभव करण्यात आला. परंतु, ही गोष्ट मार्क्सवादी विचार करणाऱ्यांना मान्य नाही. सरंजामशाही मनोवृत्तीवर मात केली गेली, याची काही निवडक उदाहरणे लक्षवेधक आहेत. एक, भारतीय राज्यघटनेने एक व्यक्ती, एक मत, एक मूल्य हे तत्त्व मान्य केले. दोन, भारतीय राज्यघटनेने पुरुषांच्या बरोबरीने महिलांनादेखील प्रौढ मताधिकार दिला. तीन, भारतीय राज्यघटनेने सर्व व्यक्तींना मूलभूत अधिकार दिले, तसेच त्या अधिकारांना संरक्षणदेखील दिले. यामुळे घटनात्मक सुधारणांच्या पातळीवर भारतीय लोकशाहीने सरंजामशाहीवर विजय मिळवला.

आपल्या राज्यघटनेमध्ये समता स्थापन करण्यासाठी अनेक तरतुदी केल्या आहेत. त्यामध्ये मागास घटकांसाठी राखीव जागांचे धोरण महत्त्वाचे आहे. जमीनदारी रद्द करणे, कसेल त्याची जमीन या तत्त्वामाणे जमीन वाटप करणे, जलसिंचन प्रकल्प

राबवणे व सार्वजनिक क्षेत्रामध्ये मूलभूत उद्योग उभारणे इत्यादी धोरणे नेहरूंच्या काळामध्ये याच उद्देशांनी राबवली गेली. परंतु, 'हिंदू कोड बिल' विरोध आणि जमीनदारी निर्मूलनास विरोध या दोन मुद्द्यांवर सरंजामशाहीने लोकशाहीच्या मूल्यांना कोंडीत पकडले होते. त्यामुळे पाचव्या दशकात लोकशाहीचा किंवा सरंजामशाहीचा निर्णायक विजय झाला नाही.

भारतीय लोकशाहीपुढील सर्वांत मोठा धोका सत्तरच्या दशकात निर्माण झाला. त्या वेळच्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी सत्ता निरंकुशपणे ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. त्याविरोधात आणि भ्रष्टाचाराच्या विरोधात जनतेच्या प्रखर चळवळी झाल्या. अलाहाबाद उच्च न्यायालयाने इंदिरा गांधींची लोकसभेवरील निवड रद्द केली. त्यानंतर राजीनामा देण्याऐवजी त्यांनी आणीबाणी लादली. सर्व विरोधी पक्षांचे नेते व हजारो कार्यकर्ते यांना तुरुंगात टाकले आणि लोकांचे नागरी अधिकार रद्द करण्यात आले. लोकशाही विरोधी घटनादुरुस्त्या करण्यात आल्या. आणीबाणीच्या विरोधात जनतेने मोठा लढा दिला. अखेरीस इंदिरा गांधींना निवडणुका घ्याव्या लागल्या. त्यात जनतेने त्यांचा पराभव केला. त्यानंतर आलेल्या जनता पक्षाच्या सरकारने लोकांना त्यांचे अधिकार पुन्हा प्रदान केले आणि ४४वी घटना दुरुस्ती करून पुन्हा अशा प्रकारची आणीबाणी लादणे अशक्य केले. त्याचप्रमाणे सतत वाद करणारा खासगी मालमत्तेचा अधिकार रद्द केला. घटनेतील 'कलम ३१' सरकारी धोरणांच्या मार्गात सर्वोच्च न्यायालयाच्या निकालांमुळे अडथळे निर्माण करत होते. म्हणून त्यामध्ये सरकारने घटनादुरुस्ती केली. संपतीच्या किंवा मालमत्तेच्या हक्कास मूलभूत हक्कांमधून काढून त्याचा समावेश कलम ३०० अ मध्ये करून त्याला कायदेशीर अधिकार देण्यात आला. या काळात प्रागतिक धोरणांच्या अंमलबजावणीसाठी मोठमोठी आंदोलने झाली. आपली राज्यव्यवस्था लवचीक असल्यामुळे वेळोवेळी घटनेमध्ये दुरुस्ती करून लोकांचा रोष कमी करण्यात आला. थोडक्यात, भारतीय जनतेने आपला मताधिकार वापरून लोकशाहीवरील सर्वांत मोठा धोका दूर केला. नागरी स्वातंत्र्यावर बंदी घातलेल्या १९७५ - ७७ मधील १९ महिन्यांच्या आणीबाणीव्यतिरिक्त घटनेची बांधिलकी दिसून येते. न्यायसंस्थेचे स्वातंत्र्यही मोठ्या प्रमाणावर मान्य झाले आहे. शेजारी दक्षिण आशियाई देश पाकिस्तान व बांग्लादेश, तसेच दक्षिण आफ्रिकेतील अनेक देश हे लष्करी हुकूमशाही आणि घटना बदलांना वारंवार सामोरे गेलेले दिसतात. या उलट, भारतीय राजकीय प्रणाली उदार लोकशाही म्हणूनच कार्यरत राहिली. हीच एक मोठी उपलब्धी समजली जाते.

सन १९८० मध्ये पंजाब व आसामध्ये तर १९९० नंतर जम्मू काश्मीरमध्ये प्रचंड हिंसाचार झाला; पण यावरचा उपाय म्हणून पुन्हा एकदा लोकशाही प्रक्रियाच उपयोगी पडली. या तिन्ही राज्यांत लोकनियुक्त सरकारांनी परिस्थिती आटोक्यात आणली. सन १९९१ ते २००० या दशकात लोकशाहीने सरंजामशाहीला जोरदार धक्के दिले. पहिला धक्का म्हणजे मंडल आयोगाच्या अंमलबजावणीची भूमिका घेतली गेली. या पार्श्वभूमीवर, लोकशाहीने सरंजामशाहीला दुसरा धक्का दिला, तो म्हणजे, महिलांसाठी राखीव जागा ठेवणे हा होय. मंडल आयोगाची अंमलबजावणी आणि महिलांसाठी राखीव जागा या दोन गोष्टींमुळे लोकशाहीविषयी एक सुप्त क्रांती घडून आली. भारतात या घडामोडीला 'लोकशाहीची लाट' असे म्हटले जाते. योगेंद्र यादव यांच्यासारख्या काही लेखकांनी यास 'लोकशाही उठाव' असेदेखील म्हटले आहे. त्यामुळे उत्तर प्रदेश व बिहार या राज्यांमध्ये प्रचंड मोठ्या घडामोडी घडून आल्या. मुलायमसिंह यादव आणि लालूप्रसाद यादव यांनी मागास समूहांमध्ये लोकशाहीची प्रक्रिया गतिमान केली. कांशीराम यांनी 'बहुजन समाज पक्ष' या संघटनेमार्फत अनुसूचित जातींचे राजकारण गतिमान केले. त्यामुळे भारतीय लोकशाही जास्त आशयघन झाली, लोकशाहीत जुन्या घराण्यांच्या बाहेरील नेतृत्व आले. तसेच, सरंजामी व्यवस्था लोकशाहीच्या विरोधात जास्त ताकदीने उभी राहिली. या दशकात इलेक्ट्रॉनिक माध्यमामध्ये सरंजामी मनोवृत्ती मोठ्या प्रमाणावर आली. इलेक्ट्रॉनिक माध्यमाने लोकशाहीचे वर्णन विपर्यस्त पद्धतीने केले; कारण इलेक्ट्रॉनिक माध्यम आणि नव्याने उदयाला आलेला नवमध्यमवर्ग यांच्यामध्ये एक प्रकारचे साटेलोटे होते. सन १९९१ नंतर देशाचे सामाजिक विघटन करणाऱ्या जातीवादी, धर्मवादी चळवळींनी तोंड वर काढले. त्यातून हिंसाचार झाला, राजकीय पक्षांचे विघटन झाले आणि काँग्रेस पक्षाचा ऱ्हास होऊन अनेक आघाड्यांची सरकारे सत्तेवर आली. त्यामुळे लोकसभा मुदतीपूर्वी भंग करावी लागली; पण नंतर आलेल्या नेमस्त अशा अटलबिहारी वाजपेयी आणि डॉ.

मनमोहनसिंग यांच्या सरकारांनी बऱ्यापैकी स्थैर्य प्रस्थापित केले. सन १९९१ मध्ये अंगीकारण्यात आलेल्या नव्या आर्थिक धोरणामुळे देशात मोठे बदल झाले. या काळातील नवमध्यमवर्ग हा नवीन आर्थिक धोरणातून उदयाला आलेला होता. त्यांचे दृष्टिकोन वरवर आधुनिक वाटत होते; परंतु या नवमध्यमवर्गाच्या मनात खोलवर सरंजामशाही मूल्यव्यवस्था होती. त्यामुळे या काळात लोकशाहीच्या विरोधातील घडामोडी प्रचंड गतीने घडत गेल्या. भारतातील लोकशाहीची प्रतीके या काळात अमान्य करण्यात आली. स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्याय यांची बाजू मांडणाऱ्या प्रत्येकाच्या विरोधात काही घडामोडी घडल्या. उदा. काही पुस्तकांवर बंदी घालण्यात आली. राखीव जागांना विरोध करण्यात आला. जात-संघटना कृतिशील झाल्या. धर्मनिरपेक्षतेला या दशकात प्रचंड मोठे आव्हान उभे राहिले. 'धर्मनिरपेक्षता' ही संकल्पनाच जवळपास रद्दबातल करण्यात आली. लोकशाही विकसित करणारे प्रादेशिक पक्ष आणि ओबीसी नेतृत्व यांच्या प्रतिमांचे मोठ्या प्रमाणावर विद्रूपीकरण झाले.

एकविसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकात भाजप पक्षाला बहुमत मिळाले. भाजप हा पक्ष सत्तेत आल्यानंतर सरंजामी व्यवस्था नव्या पद्धतीने काम करू लागली. १९९९ पासून लोकसभेत घराणेशाहीतून पुढे आलेले काँग्रेसचे ३६ खासदार होते, तर भाजपचे ३१ होते. कांचन चंद्रा यांनी संपादित केलेल्या 'Democratic Dynasties : State, Party, and Family in Contemporary Indian Politics' (पृ. ४९) या पुस्तकातून असे दिसून आले आहे की, २००४ ते २०१४ या दरम्यान सरासरी एक-चतुर्थांश भारतीय खासदार घराणेशाहीतून आलेले होते. २०१९ मध्ये, लोकसभेतील सर्व खासदारांपैकी ३० टक्के राजकीय घराण्यांतील आहेत, ही एक विक्रमी टक्केवारी आहे. त्यामुळे लोकशाहीपुढे सरंजामी मनोवृत्तीचे आव्हान निर्माण झाले आहे. या दशकात जवळ-जवळ प्रत्येक घटकराज्यातील प्रादेशिक पक्षात घराणेशाहीच्या मार्गाने सरंजामशाही आली आहे. उत्तर प्रदेश, बिहार, महाराष्ट्र या राज्यांमध्ये घराणेशाहीतून आलेल्या सरंजामशाहीचे स्वरूप लोकशाही विरोधी असलेले दिसते.

२०१४ साली नरेंद्र मोदी यांचे पूर्ण बहुमताचे सरकार सत्तेवर आले. मागील आठ वर्षांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नव्या आर्थिक धोरणाची जोमाने अंमलबजावणी करून उच्च व मध्यम वर्गाचा, विविध कल्याणकारी योजना राबवून मागास जातींचा पाठिंबा मिळवला आहे. या काळात भारतीय अर्थव्यवस्था जगामध्ये पाचव्या क्रमांकाची बनली; पण विषमता मोठ्या प्रमाणात वाढली. भाजपचा हिंदुत्ववाद आणि भारतीय राज्यघटनेचा सरनामा यांच्यात अंतर्विरोध आहे. अल्पसंख्याकांबाबत अनुदार वृत्ती, नागरिकत्वाचा कायदा, नागरिक नोंदणी, धर्मांतरबंदी यांमुळे देशाची वाटचाल लोकशाहीच्या उलट्या दिशेने होत आहे. उदारमतवाद व धर्मसहिष्णुता हे शब्द सत्ताधाऱ्यांना नकोसे वाटत आहेत. त्यामधून सत्तेचे केंद्रीकरण, घटकराज्यांवर अन्याय, संसदेचे व इतर सर्व लोकशाही संस्थांचे महत्त्व कमी करणे, नोटाबंदी तडकाफडकी लागू करणे, जी.एस.टी विधेयकाची अंमलबाजवणी, शेतकरी विधेयकातील त्रुटी, जम्मू-काश्मीरचे प्रकरण तीन वर्षांनंतरही सुनावणीस न घेणे, राम मंदिराचा निकाल, विरोधकांच्यावर भ्रष्टाचाराच्या आरोपांची चौकशी लावणे, सरकारविरोधी भूमिका घेणाऱ्या समाजमाध्यमांवर बंदी घालणे किंवा त्यांच्यावर गुन्हे नोंद करणे इत्यादी प्रकारांमुळे सद्यस्थितीतील भारतीय लोकशाही व्यवस्थेचा संकोच होत असल्याचे जाणवते. भारतीय राज्यघटनेत धर्मनिरपेक्षता स्विकारलेली असूनदेखील वोट बँकेकरिता लोकांच्या धार्मिक भावनांचा खेळ करणे हे लोकशाहीशी विसंगत आहे. बहुसंख्यांकाप्रमाणे अल्पसंख्यांकांचा सुद्धा तितकाच विचार लोकशाहीमध्ये महत्त्वाचा असतो. अंमलबजावणी संचालनालयाचे (ईडी) अधिकार याबाबतची सर्वोच्च न्यायालयाची भूमिका पण निराशाजनक आहे. त्यामुळे पुन्हा एकदा काही प्रमाणात अमृत महोत्सवाच्या काळात भारतीय लोकशाही संकोच पावत असल्याचे लक्षात येते. मोदी सरकारने याबाबत दुरुस्ती न केल्यास लोकशाही रक्षणासाठी जनतेला पुन्हा एकदा अहिंसक आंदोलनाची व मतपेटीची कास धरावी लागेल. जनतेने आपल्या राजकीय अधिकारांचा वापर करून हे नेहमी दाखवून दिले आहे की, सत्ता व अधिकारांचा गैरवापर होऊ लागला तर ज्यांच्या हातात सत्ता दिली आहे त्यांच्याकडून ती काढून ही घेता येते. कारण लोकशाहीमध्ये लोकानुमते राज्यकारभार चालत असतो.

**निष्कर्ष:-**

भारतात प्राचीन काळातील अस्तित्वात असणाऱ्या गणराज्यांपासून लोकशाहीचे अस्तित्व आढळून येते. भारतावर झालेल्या अनेक आक्रमक स्वाऱ्यांमध्येही तिचे अस्तित्व अबाधितपणे टिकून आहे. परंतु खऱ्या अर्थाने लोकशाहीची प्रस्थापना स्वातंत्र्योत्तर काळात झालेली आहे. गेल्या ७५ वर्षांच्या विविध राजकीय घडामोडींमध्ये तिचे अस्तित्व कधी प्रखर झाले, तर कधी तिचा संकोच झाला. निवडणुकांच्या माध्यमातून आपण लोकशाही व्यवस्था जरी टिकवून ठेवलेली असली तरी अभिव्यक्ती स्वातंत्र्य, समाजवाद तसेच धर्मनिरपेक्षतेची पूर्णपणे प्रस्थापना करण्यामध्ये ती आकुंचन पावल्याचे दिसून येते. जेव्हा भारत ही जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून वर्णिली जाते, तेव्हा त्यामागे इंग्लंड आणि अमेरिका यांच्याप्रमाणेच भारत ही उदार लोकशाहीप्रणाली असल्याचे सूचित केले जाते. खरोखरच घटनेच्या प्रस्तावनेत मूलत: 'भारत एक सार्वभौम, लोकशाही, लोकसत्ता असल्याचे' म्हंटले आहे. वसाहती राजवटीतून स्वातंत्र्यानंतर सार्वभौम आणि अंतर्गत किंवा बाह्य राजेशाही विरुद्ध लोकसत्ता, सार्वत्रिक मताधिकारावर आधारित मुक्त व स्पर्धात्मक निवडणुकांद्वारे सरकारची निवड या दृष्टीने लोकशाही! जरी लोकशाहीचा अर्थ अजूनही विकसित होत असला तरी ह्या अर्थाला एक ऐतिहासिक संदर्भ आहे. घटनेच्या प्रस्तावनेची सुरुवातच 'आम्ही भारतीय जनता, भारताचे एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्य ......' अशी आहे. गेल्या ५० वर्षांतल्या निवडणुका बहुतांशी मुक्त आणि न्याय्य आहेत. अनेक पक्षीय प्रणाल्या निघाल्या आणि प्रत्येक प्रमुख पक्षांनी राज्य किंवा केंद्रस्थानी केव्हा न केव्हा सत्ता संपादली आहे. एका पक्षाकडून दुसऱ्या पक्षाकडे सत्तांतर शांतिपूर्ण पद्धतीने होते आहे; ही उदार लोकशाहीची निर्णायक परीक्षा आहे. सत्तारूढ वर्गाच्या एकाधिकारशाहीचा मर्यादित वापर असूनही आपल्या बव्हंशी नागरिकांनी 'भाषण' व 'लेखन' स्वातंत्र्याचा उपभोग घेतला आहे. लोकशाही व्यवस्था कायम टिकवायची असल्यास आर्थिक आणि सामाजिक विषमता दूर करणे आवश्यक असते.विषमता कायम राहिल्यास वंचित वर्गाचा असंतोष उफाळून येतो . लोकशाहीची सर्वसमावेशकता विचारात घेणे गरजेचे आहे. बहुसंख्याकांच्या अधिकाराबरोबरच अल्पसंख्यांकांचे अधिकारही सुरक्षित कसे राहतील याचा विचार लोकशाहीत झाला पाहिजे. विरोधकांच्या न्याय्य विरोधाचा विचार सत्तारूढ पक्षांनी करणे गरजेचे आहे. कारण संसदीय लोकशाही व्यवस्थेत जसा सत्तारूढ पक्ष महत्त्वाचा असतो तसा विरोधी पक्षही महत्त्वाचा असतो. जगातील एक यशस्वी लोकशाही राष्ट्र म्हणून आपल्या भारत देशाची ओळख कायम ठेवायची असेल तर कोणत्याही सत्तारूढ सरकारने संवैधानिक मूल्यांना प्रमाण मानून लोककल्याणकारी, समाजवादी, धर्मनिरपेक्ष भूमिकेतून प्रामाणिक राज्यकारभार करणे अपेक्षित आहे.

**संदर्भसूची:**

१. व्होरा राजेंद्र व पळशीकर सुहास (संपादक) अनुवाद - चित्रा लेले (२०१०); भारतीय लोकशाही अर्थ आणि व्यवहार, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.

२. प्राचार्य देवरे, प्राचार्य विसपुते, प्राचार्य निकुंभ (२००७); भारतीय लोकशाही गणराज्य, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव.

३. डॉ. कुरकुटे हनुमंत, डॉ. खरात वसंत, डॉ. देशमुख श्रीकांत (२०२१); भारतीय लोकशाहीची वाटचाल, अथर्व पब्लिकेशन, जळगाव.

४. डॉ. पवार दीपक (संपादक) (२०२२);–'लोकशाही समजून घेताना', मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय, महाराष्ट्र.

५. चक्रवर्ती बिद्युत, हाजरा सुगतो (२०१८); सत्ता संपादन भारतातील स्थिती, सेज पब्लिकेशन, नवी दिल्ली.

६. साप्ताहिक विवेक, दिवाळी विशेष लेख, दिलीप करंबेळकर, २१/१०/२०२१.

७. https://maharashtratimes.com/ - डॉ. चौसाळकर अशोक, १४ ऑगस्ट,२०२२ यांचा 'लोकशाही यशाचा झेंडा' याविषयीचा लेख.

# आदिवासी विमर्श - स्वरुप

**प्रा. डॉ. हणमंत महादेव सोहनी**
हिंदी विभाग
सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगूड
तह. कागल, जिला कोल्हापुर

**सारांश:-**

आदिवासियों की सामाजिक दुर्दशा का प्रारंभ आर्यों द्वारा अनार्य आदिवासियों पर किये गए अन्यय अत्याचार यहीं से होता है| इसी त्रासदीपूर्ण घटनाओं के कारण आदिवासी समाज पिछड़ गए | उन्होंने त्रस्त होकर जंगलों का रास्ता पकड़ लिया | जंगलों में रहने के कारन लोग उन्हें असुर, राक्षस, पिशाच आदि नामों से पहचानने लगे | धीरे- धीरे लोगों के मन में आदिवासियों के बारे में भय निर्माण हुआ | अज की मानव संस्कृति की विविधता में नींव डालने का कार्य आदिवासी सामाजों ने किया है|

आधुनिक भारत की निर्मिती में जहाँ अन्य जातियों और समुदायों का योगदान रहा है, वहॉं आदिवासी जनजातियों का भी उतना ही योगदान है |

**बीज शब्द-** आदिवासी, साहित्य

**प्रस्तावना :-**

**'आदिवासी' शब्द–अर्थ:-**

आदिवासी शब्द का अर्थ अलग अलग शब्द कोशों में इस तरह से दिया गया है-

'बृहत् हिंदी कोश' में आदिवासी शब्द का अर्थ है, "किसी देश का मूल निवासी|"1 अर्थात् मूलनिवासी ही इस श्रेणी में आता है |

'मानक हिंदी कोश' में 'आदिवासी' शब्द का अर्थ दिया गया है -

1."किसी देश या प्रांत के वे निवासी, जो बहुत पहले से वहाँ रहते आये हों और जिनके बाद और लोग भी वहाँ आकर बसे हों |" अत: ये आदिम निवासी है |

2. आधुनिक भारत में उड़ीसा, बिहार, मध्यप्रदेश आदि में रहने वाली ओराँव, खरिया, पहाड़िया, मुंडा, संथाल आदि पुरानी जन-जातियाँ|"2 ये आदिवासी जन-जातियाँ हैं |

'नालंदा विशाल शब्दसागर' में आदिवासी शब्द का अर्थ इस प्रकार दिया है- "मूलनिवासी किसी प्रदेश या राज्य के मूल निवासी |"3 अर्थात् ये आदिवासी जन-जातियाँ ही मूल निवासी हैं |

'भारतीय संस्कृति कोश' में आदिवासी शब्द का अर्थ है– "ऐसे निवासी जो किसी क्षेत्र के मूल निवासी हों और ऐसे निवासी जो प्राचीनतम निवासी हों| दूसरी कोटि के व्यक्तियों के लिए किसी क्षेत्र का मूल निवासी होना आवश्यक नहीं है |"4 अत: मूल या प्राचीनतम निवासी होना आवश्यक है |

'सहज समांतर कोश' में आदिवासी शब्द का अर्थ दिया गया है, "अदिम वासी, गोंड, टोडा, पुरातन जन, पुरानेवासी, प्रारंभिक वासी, भील, मुंडा, शबर, संथाल कबायली, गुहावासी, मूल आवासी, वनवासी |"5

आदिवासी शब्द के इन अर्थों के आधार पर कहा जा सकता है कि किसी देश, प्रांत या समूह के वह निवासी जो बहुत पहले से वहाँ रहते हैं | वे उस स्थान के मूल निवासी हों जिन्हें आदिवासी संबोधित करते हैं |

**आदिवासी समाज का स्वरूप :-**

आदिवासी लोग एक संघ होकर एक साथ रहते हैं | आदिवासी जनजातियाँ एक-दूसरे से भिन्न है | आदिवासी लोग अभावग्रस्त जीवन जीते हैं | आदिवासी लोगों की एक विशिष्ट प्रकार की बोली भाषा है | शिक्षा के अभाव के कारन आदिवासी जन जातियाँ अंधश्रद्धा, रूढ़िपरंपरा और संस्कृति आदि में जखड गई हैं | भारत जैसे विशालकाय देश में अनेक जाति, धर्म, संप्रदाय, संस्कृति, परंपरा आदि का प्रचलन है |

भारत में कुछ आदिवासी जनजातियाँ ये पाई जाती हैं - नागा, गोंड, खासी, संथाल, भील, मुंडा, थारु आदि | ये आदिवासी जातियाँ इन राज्यों में पायी जाती हैं- महाराष्ट्र, गुजरात, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, हिमाचलप्रदेश, केरल, त्रिपुरा, मणिपुर, झारखंड, बिहार, प. बंगाल और मैसूर इत्यादि |

मुगल शासन काल में 'सबसे पहले भूमि संबंधी आदिवासियों की पारंपरिक व्यवस्था पर प्रहार किया गया | जहाँगीर के शासनकाल में सन् 1616 ई. में छोटा नागपुर पर चढ़ाई की | नागपुर के राजा दुर्जन को बंदी बनाया गया था | राजा की रिहाई के बदले उसे जहाँगीर ने कर देने पर विवश किया गया | राजा मजबूर होकर 'ईस्ट इंडिया कंपनी' को कर देने लगा | अतः जमीन पर कर वसूल करने की प्रक्रिया तब से शुरू हुई होगी ऐसा महसूस होता है।

भारत में व्यापार बढ़ाने के लिए ब्रिटिश शासकों ने अपनी सुविधा के लिए रेल लाइनों का जाल यहा के आदिवासियों के खेती पर बिछाना शुरु किया | वन-वृक्षों पर ब्रिटिश शासकों ने धावा बोल दिया | ब्रिटिश शासक जंगलों का कानून बना कर आदिवासियों का वनों पर जो अधिकार था वह धीरे-धीरे छिनने लगे | परिणाम यह हुआ की आदिवासियों की जमीने छिन गयी और वे भूमिहीन हो गए | भूमिहीन होने के कारन आदिवासी जनजातियों में आक्रोश भर गया | अपने अधिकार, अपनी जमीन और अपने अस्तित्व आदि को पाने के लिए आदिवासियों ने कई आंदोलन भी किए | आंदोलन करने वालों में कुछ प्रमुख नामों में संथाल हूल और बिरसा मुंडा आदि का योगदान महत्वपूर्ण रहा है |

आदिवासियों के आंदोलन के संदर्भ में रमणिका गुप्ता जी लिखती है, "राष्ट्रीय स्वतंत्रता आंदोलन के साथ-साथ एक सशक्त सामाजिक, सांस्कृतिक पुनर्जागरण के आंदोलन भी थे, जो ब्रिटिश साम्राज्यवादी शासन के खिलाफ झारखंड क्षेत्र में लड़े गए थे |"6 स्वतंत्रता के बाद आदिवासियों के मन में यह आशा जागृत हो गई थी कि अब हमे अपने अधिकार प्राप्त हो जाएंगे, लेकिन उनकी आशा के अनुसार कुछ भी नहीं हुआ | स्वतंत्रता के बाद भारत सरकार ने आदिवासियों की रक्षा करने की अपेक्षा अंग्रेजों द्वारा बनाए जंगल कानूनों को और भी सख्ती से लागू करना शुरू कर दिया | अत: आदिवासियों का विस्थापन और पलायन होने लगा |

स्वतंत्रता की लड़ाई में आदिवासियों ने बहुत योगदान दिया था लेकिन आदिवासियों के नाम कहीं भी आगे नहीं लाए गए | उनके अधिकारों का भी हनन होता रहा | सरकार की इस कुट-नीतियों के कारण आदिवासी जमीन के मूल मालीक होकर भी मालिक बनने के बजाय मजदूर बनने पर विवश हो गए | आदिवासी लोग अपनी रूढ़ि-परंपरा, संस्कृति और सभ्यता को बढ़ावा देकर सुरक्षित रखना चाहते थे, लेकिन मजबूर होकर उन्हें अपनी संस्कृति से दूर रहना पड़ा | अत: उन्हें अपनी ज़मीन से जुड़ने नहीं दिया गया | आदिवासियों को हमेशा असभ्य, जंगली, अनपढ़, गवार कहकर हीन भावना से ग्रसित किया गया | सदियों से इन्हें खदेड़ा जा रहा है | इनके विकास की ओर ध्यान देने की अपेक्षा उनका शोषण होता रहा |

आदिवासियों में स्वतंत्रता प्राप्ति के बाद सबसे बड़ी आशा की किरण प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरु जी ने जगाई | उन्होंने आदिवासियों के विकास के लिये 'पंचशील' का प्रस्ताव दिया | पंचशील प्रस्ताव में प्रधानमंत्री जी ने इस बात को महत्त्व दिया था कि आदिवासियों को अपनी प्रतिभा के आधार पर विकास करने का अवसर देना चाहिए | उन्होंने इसके लिए प्रयास भी किए | प्रथम पंचवर्षीय योजना में आदिवासियों के विकास के लिए कार्य शुरू किया गया | परंतु अफसोस इस बात का है कि इन योजनाओं में किया जाने वाला आर्थिक व्यय दिन प्रतिदिन बढ़ने के बजाय कम होता चला गया | वर्तामान काल में भी इस स्थिती में कोई परिवर्तन नहीं दिखाई देता | आदिवासियों के विकास की योजनायों पर किया जाने वाला खर्च उत्तरोत्तर घटता चला गया | आदिवासी

कबीलों के अधिकारों के संरक्षण और उन्हें उनके अधिकारों को प्राप्त करवाने के लिए संविधान में समय -समय पर प्रावधान दिए गए हैं | सत्य यह भी है कि इन प्रावधानों का उल्लंघन भी समय-समय पर होता रहा है |

संविधान निर्माताओं ने आदिवासियों के हितों को ध्यान में रखते हुए पाँचवी अनुसूची में यह कहा है कि, राज्यपाल अन्य बातों के साथ- साथ संविधान में अन्य किसी उपबंध के होने पर भी अनुसूचित क्षेत्रों में भूमि हस्तांतरण पर प्रतिबंध लगा सकेंगे | परंतु सच्चाई यह है कि कानून बना देना समस्या का हल नहीं है | सरकार ने कानून तो बना दिए परंतु उसे व्यावहारिक रूप से अमल में लाने के ठोस प्रयास नहीं किए गए | आदिवासियों की जमीनें इन कानूनों के होते हुए भी गैर मार्ग से हस्तांतरित होती रही | कानून तो बनाया परंतु अमल करनेवालों ने उसमें समय -समय पर गड़बड़ी कर दी | 'छोटानागपुर कास्तकारी अधिनियम,1908 का कहना है कि आदिवासियों की जमीन गैर-आदिवासी लोग नहीं खरीद सकते | आदिवासी सात वर्ष के लिए अपनी मर्जी से अपनी जमीन किसी को भी 'भुगुत-बंधक' के रूप में दे सकता है | उसकी जमीन पर कोई भी गैर-आदिवासी काबू नहीं कर सकता |

रमणिका गुप्ता लिखती है कि, "अनुसूचित जाति एवं जनजाति (अत्याचार निवारण) अधिनियम 1989 में यह कहा गया है कि आदिवासी भूमि के मालिक ने जो भूमि बंधक में दी है उसका उपभोग बंधकदार केवल एक अवधि विशेष के लिए कर सकता है परंतु वास्तविकता यह है कि अवधि समाप्त होने के बाद भी वह भूमि आदिवासी मालिक को वापिस नहीं दी गई |"7 अनेक प्रकार से एक्ट लागू होने पर भी आदिवासियों के शोषण का कोई अंत नहीं था |

बिरसा मुंडा आदिवासियों में मसीहा के रूप में प्रसिद्ध है | अपने समुदाय के पिछड़े लोगों को संगठित करने का पहला काम उन्होंने ही किया था | उनके हृदय में अपने अधिकारों को हासिल करने की चेतना इन्होंने ही जगाई थी | बिरसा मुंडा ने विद्रोह का बिगुल बजाया | बिरसा मुंडा के इस आंदोलन को समाप्त करने के लिए पुलिस ने भी कई अत्याचार किए | अत: बिरसा मुंडा के आंदोलन को रोकना आसान नहीं था | बिरसा मुंडा को पकड़ने के लिए उनके समर्थकों में कुट नीति से फूट डाली गयी | सरकारी इनाम की लालच में आकर लोगों ने बिरसा की खबर दी गई जिसका नतीजा यह हुवा की पुलिस वालों को बिरसा मुंडा को पकड़ना आसान हो गया | आखिर बिरसा मुंडा को पुलिस वालों ने गिरफ्तार कर लिया |

डॉ. चौहाण और डॉ. वणकर इस संबंध में लिखते हैं, "आत्मविश्वास, शोषण के सामने आवाज उठाना, अपने राज्य के लिए लड़ना, जमीन की मालिकी के लिए प्रतिबद्ध कार्य किये थे बिरसा ने |"8 बिरसा के आंदोलन की उपलब्धियाँ भी इतिहास में दर्ज हैं |

**निष्कर्ष :-**

बिरसा मुंडा के नेतृत्व में जो आंदोलन आरंभ हुआ था, उस आंदोलन की आज पुनः आवश्यकता महसूस हो रही है | बिरसा मुंडा का प्रस्तुत आंदोलन परिवर्तन लाने में सफल रहा है | आज राज्यों के मंत्रीमंडल, शासकीय, गैर शासकीयसेवाओं में भी आदिवासियों का समायोजन हो रहा है | आधुनिक यूग में वह आदिवासी नहीं हैं,जो डरे और सहमें हुए | तो वह अपने अस्तित्व, अधिकार आदि की रक्षा करने के लिए जन आंदोलन के रूप में एकसाथ उभरते हुए आदिवासी नजर आते हैं | आदिवासियों को जमींदारों, जमीन के हस्तांतरण, मानसिक, शाशीरिक और आर्थिक शोषण से मुक्त देने वाले कानून मौजूद हैं | प्रस्तुत कानूनों से आदिवासियों को कुछ हद तक राहत तो अवश्य मिली हैं, लेकीन अभी भी शासन के दृष्टिकोण में परिवर्तन लाने की आवश्यकता है | आज आदिवासी वनवासी नहीं रहा है, जिसे आम लोग जंगली, अनपढ़ आदि कहकर उसका उपहास नहीं करते | आजका आदिवासी अब समाज का सशक्त नागरिक बनकर समाज में उभरने के लिए खड़ा है | आदिवासियों आज अपने हक्क और अस्तित्व की आधुनिक स्थिति को भोग रहे हैं | आदिवासियों में अपने साथ हुए भेद-भाव और अन्याय का बोध भी जगा है | परिणामत: आज आदिवासियों का अस्तित्व बहुत मजबुद बन गया है |

**संदर्भ ग्रंथ:-**


1. सं. कालिका प्रसाद - बृहत् हिंदी कोश पृ. 125
2. सं. रामचंद्र वर्मा - मानक हिंदी कोश, खंड -1 पृ. 264
3. सं. नवल - नालंदा विशाल शब्दसागर पृ. 126
4. लीलाधर शर्मा - भारतीय संस्कृति कोश पृ. 98
5. अरविंद कुमार, कुसुम कुमार - सहज समांतर कोश पृ. 121
6. सं. रमणिका गुप्ता - आदिवासी विकास से विस्थापन पृ. 42
7. सं. रमणिका गुप्ता - आदिवासी विकास से विस्थापन पृ. 16
8. सं. डॉ.धनंजय चौहाण, डॉ.धीरज भाई वणकर - भारतीय साहित्य एवं दलित चेतना पृ. 319

# आदिवासी समाज एक चिंतन

**प्रा.सौ. सुखदा सदाशिव हाटवळ**
यशवंतराव चव्हाण (के एम सी) महाविद्यालय,
कोल्हापूर ( मराठी विभाग)
मो. 9359822918

**प्रस्तावना:-**

9 ऑगस्ट हा दिवस जागतिक आदिवासी दिवस म्हणून साजरा केला जातो या दिवशी जगभरात आदिवासी बांधव एकत्र येऊन आपापल्या संस्कृती प्रमाणे केशभूषा गायन नृत्य करून हा दिवस साजरा करतात मानवाची जसजशी उत्क्रांती होत गेली तस तसा मानव पृथ्वीवर निरनिराळ्या खंडापर्यंत प्रवास करू लागला तेथील वातावरणाशी त्यांनी जुळवून घेतले हळूहळू शब्द बोली आणि पुढे भाषा संवाद अशी उत्क्रांती होत गेली आजही जगाच्या कानाकोपऱ्यात अनेक आदिम जमाती आपली बोलीभाषा रूढी परंपरा जपत निसर्गाच्या सानिध्यात राहत आहेत आधुनिक दुनियेच्या झगमगटापासून आजही अनेक लोक कोसोनकोश दूर आहेत अनेक वर्षानंतर संयुक्त राष्ट्रसंघासमोर जी बाब आली ती अतिशय धक्कादायक होती ती बाब म्हणजे मूळ निवासी समूहाने निसर्ग जपण्याचे मोलाचे कार्य केले यासाठी हा समाज म्हणून या समाजाची माहिती करून आवश्यक वाटते.

**उद्देश :-**

1) 21 व्या शतकातील आदिवासी जमातीचे सामाजिक स्थान समजून घेणे.
2) आदिवासी समाजातील समस्यांचा अभ्यास करणे.
3) आदिवासी समाजाला सर्व सोयी सुविधा लाभ करून देण्यास मदत करणे.
4) आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात आणणे.
5) आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करणे.
6) आदिवासी समाजाला सरकारी योजनांचा लाभ मिळवून देणे.

**अभ्यास पद्धती : -**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम साधनसामग्रीचा वापर करण्यात आला आहे. आधुनिक भारतामध्ये आदिवासी लोकांची जीवनशैली, त्याची दयनीय अवस्था, मुख्य समाज प्रवाह पासून दूर राहिल्याने होणारी त्यांची दुरावस्था, पारंपारिक आणि जुन्या चालीरीतींचा अवलंब करणारा समाज सुशिक्षित व्हावा, त्यांचा विकास व्हावा या दृष्टीने मी इतर साहित्य अभ्यासून हा शोध निबंध लिहीत आहे.

**आदिवासी म्हणजे काय**

1) समान बोलीभाषा बोलणाऱ्या व एकाच समान भूप्रदेशावर वास्तव करणाऱ्या समूहाला आदिवासी म्हणतात.

- डब्ल्यू जे पेरी

2) एका विशिष्ट भूप्रदेशावर राहणारा समान बोली बोलणारा व समान सांस्कृतिक जीवन जगणारा पण अक्षर ओळख नसलेला स्थानिक गटाच्या समूहाला आदिवासी म्हणतात.

- गिलीन

**आदिवासींच्या मुख्य जमाती :-**

1) कातकरी 2) कोलाम 3) कोकणा 4) ठाकर 5) भिल्लू 6) कोकरू 7) मल्हार कोळी 8) गोंड 9)महादेव कोळी 10) माडिया गोंड 11)पारधी 12) फासेपारधी.

**आदिवासी समाज :-**

आदिवासी ही फार जुनी संस्कृती आहे. या जमातीमधील लोकांच्या चालीरीती, धार्मिक कल्पना ,रितीरिवाज ,उपासना या प्रत्येक जमातीनुसार भिन्न- भिन्न आहेत. आदिवासी लोक हे निसर्ग पूजक आहेत. आकाश, तारे ,ढग, पाऊस ,सूर्य ,चंद्र ,झाडे, वन्यजीव, वाघ ,हरीण, साप, विविध पक्षी यांना ते देव मानतात. त्यांची पूजा करतात. रोगराई, महामारी आल्यास ईश्वराच्या कोपामुळे झाल्याचे ते मानतात. डॉक्टरांकडे न जाता अंगारे, भगत ,झाडपाला यांचा औषध म्हणून उपयोग करतात. रानावनात जंगलात राहत असल्याने त्यांची घरी पक्की नसतात. कुडाची व कौलारू असतात. आदिवासी खूप अंधश्रद्धाळू असतात . रोगराई आजारपण आले की ते वस्ती सोडतात. आदिवासी समाजात एकत्र कुटुंब पद्धती आढळते हे लोक समूहाने राहणे पसंत करतात. आदिवासी समाजाचा शेती व पशुपालन हा मुख्य व्यवसाय असतो. गवत विकणे ,लाकडे, डिंक , मध गोळा करणे , दारू विकणे इत्यादी काम ते करत असतात. रानटी प्राण्यांची शिकार करणे ,मासेमारी करणे हे त्यांचे आवडीचे उद्योग आहेत.

आज 21 व्या शतकात त्यांच्या राहणीमानाचा दर्जा फारसा उंचावलेला दिसून येत नाही. त्यांचा पोशाख साधा असतो. पुरुष लंगोटी किंवा गुडघ्यापर्यंत धोतर घालतात. स्त्रिया एक वस्त्र बांधतात .स्त्रिया नैसर्गिक दागिने घालतात . मन्यांच्या माळा किंवा रंगांचे दगड ,फुले ,बिया यांचा त्या दागिने म्हणून वापर करतात.

लग्न समारंभात आदिवासी स्त्रियां चांदीचे दागिने वापरतात. स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही हा समाज तसा उपेक्षितच राहिला आहे. बहुसंख्या आदिवासी निरक्षर आहेत. उदरनिर्वाह करण्यापलीकडे त्यांचे मोठे असे ध्येय नसते. जंगलात भटकंती करणे, दऱ्याखोऱ्यातून फिरणे, निसर्गातील विविध वस्तूंपासून आपल्याला आवश्यक असणारी साधने तयार करणे हाच त्यांचा दिनक्रम ठरलेला असतो. आदिवासी समाजाची अर्थव्यवस्था स्वतंत्र व स्वावलंबी आहे. आपल्या उपजीविकेपुरते ते अर्थ उत्पादन करतात. आदिवासी आर्थिक जीवन प्रामुख्याने निसर्गावर आधारित आहे.

**आदिवासी समाजातील समस्या :-**

१)आदिवासी समाजातील लोकांमध्ये शिक्षणाचा अभाव जाणवतो. अजूनही खूप आदिवासी निरक्षर आहेत.

२) आदिवासी समाजातील लोकांना कायमस्वरूपी रोजगार मिळत नाही. त्यामुळे हे लोक आर्थिक दृष्ट्या मागासलेले दिसतात.

३) आदिवासी समाजात शेती हा मुख्य व्यवसाय आहे. तरीही शेतीची आधुनिक पद्धत त्यांना माहीत नसल्याने उत्पन्न कमी होते. हे लोक स्थलांतरित शेती करतात.

४) सरकारच्या जंगल विषयक कायद्यामुळे आदिवासी लोकांना शिकार लाकूडतोड दारू तयार करणे, जंगलातील विविध वस्तू व पदार्थ जमा करणे, शेती करणे यावर निर्बंध आले आहेत.

५) आदिवासी समाजात अंधश्रद्धा मोठ्या प्रमाणावर आजही आढळून येते.

६) आदिवासी लोकांचा आर्थिक आणि सामाजिक दर्जा खालावलेला दिसून येतो.

७) आदिवासी समाज जंगलात दऱ्याखोऱ्यात राहत असल्याने तेथे सर्व आधुनिक सेवा सुविधांचा अभाव जाणून येतो.

८) दळणवळणासाठी रस्ते वाहतूक सुविधा ,दवाखाने ,शाळा, महाविद्यालय, संगणक इत्यादी सोयी कमी प्रमाणात उपलब्ध आहेत.

९) आदिवासी भागात कुपोषणाचे प्रमाण जास्त आहे. कारण त्यांचे राहणीमान आणि योग्य त्या वैद्यकीय सेवांची कमतरता होय.

१०) आदिवासी लोकांना जंगल कंत्राटदाराकडून आजूबाजूच्या परिसरात काम उपलब्ध होते . रस्ते बांधणी ,दुरुस्ती ,ऊस तोडणी, द्राक्ष तोडणे, जंगलातील विविध कामे मिळतात .पण कमीत कमी मजुरीत त्यांच्याकडून जास्तीत जास्त काम करून घेतले जाते.

**आदिवासी समाजाच्या विकासासाठी आवश्यक उपाययोजना :-**

१) जनजागृती करणे- आदिवासी समाजामध्ये अनेक अनिष्ठ रूढी, परंपरा आहेत बालविवाह करणे, अंधश्रद्धा पाळणे, अनिष्ट चालीरीतींचे पालन करणे , अशिक्षित पणा, वर्षानुवर्षे चालत आलेल्या परंपरा यांचा अवलंब करणे यामुळे हा समाज मागासलेला आहे. त्याविषयी त्यांना समजावून सांगून जनजागृती करणे गरजेचे आहे.

२) शिक्षणाची सोय करणे- आदिवासी समाजातील प्रत्येक घराघरात शिक्षणाची ज्ञानगंगा पोचली पाहिजे. प्राथमिक, माध्यमिक शिक्षणाबरोबरच उच्च शिक्षणाची सोय देखील होणे गरजेचे आहे. तरच आदिवासी तरुण उच्च शिक्षण घेऊन स्वतःच्या समाजाचा सामाजिक स्तर उंचावेल त्याचे राहणीमान उंचावेल.

३) रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे:- आदिवासी समाजातील युवावर्ग बेरोजगार आहेत त्यांना कायमस्वरूपी रोजगार मिळवून दिला पाहिजे म्हणजे त्यांचे आर्थिक स्थिती सुधारेल.

४) शेतीमालाला योग्य भाव देणे:- आदिवासी लोकांचे आर्थिक स्थिती सुधारल्याशिवाय त्यांचा विकास होणार नाही. यासाठी आदिवासी शेतकऱ्याला योग्य शेती पद्धतीने चे ज्ञान देऊन त्याचे शेती उत्पन्न वाढवले पाहिजे. त्याच्या शेतीमालाला योग्य बाजारपेठेत भाव मिळवून दिला गेला पाहिजे.

५) शेतीपूरक उद्योगाला चालना देणे:- आदिवासी लोक शेतीबरोबरच पशुपालन, मासेमारी, दुग्ध व्यवसाय यासारखे अन्य व्यवसाय करत असतात. या व्यवसायांना प्रोत्साहन देऊन त्यांना प्रोत्साहन पर अनुदान देऊन या व्यवसायांना पूरक मंजुरी दिली पाहिजे.

६)विविध सरकारी योजनांचा लाभ मिळवून देण्यास मदत करणे:- भारत सरकारकडून आदिवासी विकास योजनेसाठी अनेक प्रभावशाली योजना मंजुरी केल्या आहेत. पण त्या आदिवासी जमाती पर्यंत पोचतच नाहीत. त्यांना त्याबद्दल माहिती देणे गरजेचे आहे या योजनांचा लाभ करून घेण्यास आदिवासी जमातीला प्रोत्साहित करून मदत केली पाहिजे. आदिवासी विकास योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी झाली तरच आदिवासी समाजाची सुधारणा होईल.

७)राजकीय जनजागृती करणे:- आदिवासी समाजात आजही मोठ्या प्रमाणात राजकीय उदासीनता दिसून येते. आदिवासींना आरक्षण आहे तरी त्याचा फायदा काही ठराविक आदिवासीच घेतात. या समाजातील प्रत्येक घटकाला राजकीय हक्क मिळायला पाहिजे राजकीय नेतृत्वाच्या अभावामुळे आदिवासी समाजाच्या प्रश्नांना कायदेमंडळात वाचा फुटलेली नव्हती पण आज भारताच्या सर्वोच्च नागरी पदी राष्ट्रपती द्रौपदी मुर्म आहेत. या एक आदिवासी महिला आहेत आणि त्यामुळे येत्या काही दिवसातच आदिवासींमध्ये परिपूर्ण सुधारणा झालेली दिसून येईल.

**निष्कर्ष:-**

आदिवासी समाज हा प्रगत समाजापासून अलिप्त असतो. या समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सरकार विविध योजना राबवत आहे. त्याची योग्य अंमलबजावणी झाली तर नक्कीच आदिवासी समाज सामाजिक, आर्थिक ,राजकीय, शैक्षणिक दृष्ट्या

प्रगत होईल. पंडित जवाहरलाल नेहरूनी सांगितलेल्या विकासाच्या पाच सूत्रांचा वापर सरकारने केला तर आदिवासी जीवनात फार ढवळाढवळ न करता त्यांना सुखी जीवन जगण्यास मदत होईल. आदिवासी जीवन आनंदी व प्रगतशील होईल.

**संदर्भ :-**

१) डॉ. गोविंद गारे - महाराष्ट्रातील आदिवासी जमाती

२) आगलावे प्रदीप - आदिवासी समाजशास्त्र

३) अमोल वाघमारे - आदिवासी काल, आज आणि उद्या, आदिम संस्कृती अभ्यास संशोधन केंद्र प्रथम आवृत्ती

# Ecology in Philip Larkin's Poetry

**1. Dr. Kavita Tiwade**,
Associate Professor,
Head, Department of English,
Vivekanand College,
Kolhapur (Autonomous)
**2. Dr. Salama Isak Maner**
Assistant Professor,
Department of English,
Vivekanand College,
Kolhapur (Autonomous)

**Abstract**

The present paper is an attempt to study the contribution of Philip Larkin's poetry to understand ecological consciousness of man. Larkin's poetry is studied in the light of Eco-criticism and natural resources. This paper analyses Larkin's poetry, by paying specific attention to the poet's precognition of a looming disorder that eco-critics and environmentalists later came to conceptualize as the ecological crisis. The poems in the volumes North ship to 'High Window' have proved to be very provocative and disturbing to many people in England, not only because of their style and technique. The present paper is about Philip Larkin's nature poems.

**Keywords:** Eco-criticism, Environment, Ecology, Ecological crisis

---

Eco-criticism is simply defined as the interrelation between nature and literature. The term 'Eco' is derived from 'oikos' which means 'home or house' and in eco-criticism, home means environment. Eco-criticism or environmental consciousness in his seminal work is "The Environmental Imagination Thoreau, Nature Writing, the formation of American Culture". It includes-

"whether the non-human nature is a mere framing device or facade. Environment is a process, not a static condition. Human interest is not the legitimistic interest. The text shows humans as accountable to nature". (Nayar 252)

Eco-criticism is one of the important aspects of the study over the last decades. It is about the relationship between man and nature. The twentieth century has threatened by ecological, imbalance.

Philip Larkin is one of the leading poets of the post – war period in England. He was identified in the fifties with The Movement. The Movement is regarded as a reaction to the excesses of modernist

poetry and fiction of the early 20th century. Larkin was influenced by Dylan Thomas. In 1946, Larkin developed his poetic vision through images from the nature.

Nature is one of the important themes of the collection The North ship because it shows his philosophy of life. To Larkin, Nature does not inspire nor does it offer any respite from the tedium and loneliness of life. His landscapes are half lit, lazy and featureless. His nature is cold, alienation and powerful motion. The flower, the trees, branches fade and rot and face the passing and final destruction. The poet's mind picks the gloomy aspect of everything, the cold and soul chilling winter, the wind and gales, dirt and dust, decayed leaves and tree branches grey stormy scenes.

The depiction of nature indeed, evokes sad visions. Nature lies heavily on his soul like a sodden blanket.

In 'Blizzard', he describes a snow storm. In "Blizzard',

Suddenly clouds of snow
Begin assaulting the air,
As falling, as tangled
As a girl's thick hair
Some see a flock of swans
Some a fleet of ships
Or a spread winding sheet
But the snow touches – my lips

(75 N Blizzard, P. 46 TNS)

The clouds of snow 'assault the air'. They are likened to the tangled thick hair of a girl, a flock of swans, a fleet of ships or winding sheet. There is a dreamlike fantastic quality which makes him deliberately difficult. The dreams are nightmarish and are in keeping with his vision.

The images of clouds, shadows, nights find fitting emotional parallels in silence solitude, darkness. It is also be seen in the following poem.

…………..sleep is made cold
By a recurrent dream
Where all things seem
Sickeningly to poise
On emptiness, on stars
Drifting under the world

(Songs 65 N P. 45 TNS)

In Songs 65 N, the sequence develops in a mysterious way as it seeks, to make associations gathering round the voyage of the North ship. It is structured around the images of coldness and erotic love filled with fear. From the stylistic point of view, the poem shows Larkin's indulgence in self – conscious poeticism. The nature images are shift his observation and diction shows an excessive dependence on similes and metaphors.

In the North Ship, Larkin experiments with that poetry which is seen by the untutored mind as truly poetic, a representative of a mystical, Neo- Gothic world, where melancholy and must roll together over half lit landscapes, winding at same deep, inner meaning but which if we experience them closely, have nothing below the surface of interest.

Larkin sees his own bleak sensibility in terms of the panorama of nature. The effect of nature's power and occasional malevolence on the poet is not addressed in many of these poems through it creates an appropriate setting for their descriptions of disillusionment.

There are often trees and wind
And sand as in Night music
At one, the wind roe
And with it, the noise
Of the black popular

The star imagery in Night – Marie brings out the rich background of the stars in their blazing solitude. They are the fixed points of light and contrasted with the moving object the earth with its blowing winds and the black poplars.

There are bleak fields on every side, Larkin's landscapes are assailed by blowing winds, wastes of plants.

And in their blazing solitude
The stars sang in their sockets
Through the night
Blow bright, blow bring
The coal of this unquickened world. (TNS p.11)

In the last stanza, its twofold contrast and circular is enacted briefly as the poet glances at the sky to measure its creative potential, lost in contemplating. The stars sang in their hallow place, he makes a feeble effort to lose himself in the world of the divine and in their blazing solitude, but his earthly time limitation immediately assert themselves and to give this attempt unfruitful. So he has been drawn back to earth and to this unquickened world. It is an unquickened world because it is held in its captive, he feels the slow passage of hive.

The seasonal process and night and day cycle are recurrent them in Larkin is poetry. Larkin's approach to nature is unromantic. He seems on the verge of being romantic, but suddenly takes a different turn, gloomy and changes the whale approach.

As Donald Daine says, We recognize in Larkin's poems the season a present day England, but we recognize also the seasons on English soul the moods he expresses our moods too through we may deal with them differently (1973 P.66)

In 'One man walking a Deserted Platform '

One Man walking a Deserted Platform,
Dawn coming and rain driving
Across a darkening autumn
One man restlessly waiting a train

(CP P.289)

This poem begins a narrative mode, accommodating a descriptive strain which is sustained in the first seating but snaps in the second, where it yields place, quite characteristically to semi symbolist speculations. Dawn is approaching and rain is driving across a darkening autumn.

The speaker is a lonely man, walking a deserted platform and then restless waiting for a train, the rain.

"Beating each shuttered cause that seems folded, full of the dark silk of dreams. A shell of sheep cradling a wife or child". (CP P.289)

The images of 'the dark silk of dreams' enfolding the people in the closed houses of a 'Shell of sheep', walking the near and dear once into a seemingly abiding state of coziness are all suggesting of a vast but meaningless world of illusions that love creates 'sleep were becomes a symbol of delusion, while the image of the shell reinforces its hard and impregnable nature.'

Ruby quotes, the poem may be said to contain the seeds of Larkin's mature poetry in two respects- first, in the vivid realistic setting and secondly in the speaker's sympathetic, identification with another individual.

There is an attempt here at evoking an atmospheric effect with the help of some minute details like a lonely man, deserted platform, someone waiting for a train, a day dawning, stars selling, locks crowing etc.

Larkin's approach to nature is obviously unromantic. He seems on the verge of being romantic, but suddenly takes a different turn, gloomy and changes the whole approach. As Donald Daine says, We

recognize in Larkin's poems the season of present day England, but we recognize also the seasons on English soul, the moods, he expresses are our moods two through we may deal with them differently (Donald David, 1973. P. 60)

The spring, Larkin describes people, who are resting on the grass as green shadowed people.

On the other hand the children 'Fringler the fresh born grass. 'Weather is calm, a single cloud which is static in the sky and only one bird singing somewhere. The speaker describes his own childhood to feel its pathos. The pleasantness of the Nature does not make the speaker happy –

………and me
Threading my pursed – up away
Across the park
And indigestible sterility
There is a grateful even greedy,
Appreciation (CP P.84)

The poet shares the radiance of Spring, through he walks in 'indigestible sterility'. He carefully observes and reacts to the spring as a season. When confers on man and nature, then he relates himself to it weariness which overtakes him. It seems that Larkin's vision is more prone to catch at sorrow and regret nature for Larkin is allegorical. He reads in it human future.

Larkin's another poem 'Dry point' describes the destruction of things in the nature. The struggle is between the man and the nature. The ultimate power of the world is nature. Man is struggling for his existence. But he realizes that everything is going to transform into ashes Larkin says,

Endless time honoured
A bubble is restively forming at your tip
Burst it as fast as we can
It will grow again, until we begin dying

Man is a silent observer. He accepts his debate. The poem 'Absences' is about the poet's fascination with how the familiar place would look like without him. There are no ships, no coasts, only a horizon and a sky.

Yet more shore less. (cp, P. 49)

In which clouds are gathered. This poem express a desire to escape from time and place in order to experience the truth. There is an interlink between 'wants', 'here' and 'high windows'. In all these poems Larkin shows such a desire for release, they celebrate a condition of vacancy. These poems end up

with a vision of release and fulfillment symbolized through images of sky, water and rain. Here, sea, water is important. Rain patters on a seat that tilts and sighs,

The poem ends with a cleansing joy such attics, cleared for me! Such absences!

Water is one of the important parts of nature. The sea stands for life. Water is a symbol of life and death. The sea is an unending source of rain. The clouds form and fall again as rain, goes into the sea. The movement of time and water in nature is completed.

Larkin has observed the life of common human beings. They are engaged from morning to evening in their daily routines. The evening and shade of darkness and night makes them restless. They come to know the meaninglessness of life and the emptiness of the activities life is an empty dream.

Larkin shows his capacity for experiencing epiphany visions mystique beauty of life. In two other poems of the Witsunweddings that may be called 'journey poems', 'Here' is the inaugural poem of this volume and the other one is the title poem. 'Here' records a journey by train (as the word 'halt' indicates) up through England towards Hull.

Rich industrial shadows
And traffic all night north

We are taken one along graphically through landscapes of gradually increasing solitude one scene dissolving into another and the camera sweeping over 'the widening river's' slow presence towards and sudden surprise of large town. The second and third stanzas give a vivid and closely observed depiction of the town and its inhabitants. The speaker lingers for sometime over the commercial activities of the 'cut prince crowd' in a busy town –

"This is an area where
Silent stands
Like heat, Here leaves unnoticed thicken
Hidden weed's flower, neglected waters quicken
Luminously peopled are ascends. " (cp.. p 136)

The isolated villages too are full of activities but of a very different kind as they only enlace a sense of their hidden life of nature. The final lines take us further still to a beach and beyond it, to the sea.

And past the poppies bluish neutral distance
Ends the land suddenly beyond a beach
Of shapes and single.
Here is unfenced evilness.

Facing the sun, untalkative, out of reach (cp. P 136-37)

In ‘Afternoons’, Philip Larkin presents nature as being intertwined with the life of the people who live in the surroundings of nature.. The poem does not remove the people from their surroundings; instead it beautifully integrates their life with the elements of nature around them.

The leaves falling on the ground in the afternoons along the rooms, where mothers come to free their children at the end of a hard day at school. It is not something pleasurable that the mothers want to do. They are caught in the routine of everyday life and this job in the afternoons is something that they do on an everyday basis. The day progresses as nature intends it to be, and husbands meet their wives at specified intervals at the same places.

The present paper an attempt to examine the selected poems by Philip Larkin from an ecological perspective in order to establish a logical relationship between nature and Philip Larkin’s poems. The technological outburst and its impact on environment is the approach of the study .Philip Larkin is considered as a significant nature poet. The poems of Philip Larkin have proved to be very provocative and disturbing to many people in England, not only because of their content but also because of their style and technique .Nature plays a vital role in Larkin’s poetry .Nature takes the place of religion .It gives a feeling of continuity overcoming the fear of morality . Larikn’s nature poems takes on vivid colour. His poems are about nature and its status in life. His nature appeals to common man as it deals with what is common in man .Nature is for Larkin is not beauty or spirituality but it symbolizes of life and death. Larkin has described his poems through ecological point of view. The theme of nature in his poetry has described the loss and regret ,the past and his countryside ,are typical features of the Movement .The theme of nature and life interwoven in his poems .Larkin writes truthfully about nature .

**Reference:**

1. Anthony, Thwaite. ‘Collected Poems of Philip Larkin, London: Faber and Faber, 1964’
2. Gloftelty, Cheryll. ‘Introductiom,’ The Eco-criticism Reader. Landmarks in Literary Ecology, eds. Glotfelty, Cheryll, and Harold Fromm. Athens and London. The university of Georgia Press, 1996. Print
3. High windows, London: Faber and Faber, 1974.
4. Motion, Andrew. ‘A Writer’s Life, London: Faber and Faber, 1993
5. Volkman, Laurenz Nancy Grimm, Ines Detmers and Katrin Thomson (Eds.) Amsterdam/ New York, NY, 2010, XVIII, P.370. ANSEL Papers 15.
6. Pramod K. Nayar, Contemporary Literary And Cultural Theory: From Structuralism To Ecocriticism, Pearson, Page No. 252

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020, उच्च शिक्षण आणि प्राध्यापक:एक अभ्यास

**डॉ पांडुरंग बाळकृष्ण पाटील.**
ग्रंथपाल,
श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय ,
दसरा चौक कोल्हापूर, महाराष्ट्र.
मोबाईल नंबर:9272474354 .

**सारांश:**

सदर संशोधन लेखात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020, उच्च शिक्षण याबाबत थोडक्यात माहिती दिलेली आहे या अनुषंगाने प्राध्यापकांसाठी गुगल फॉर्मच्या माध्यमातून प्रश्नावली देण्यात आली होती त्यास 55 प्राध्यापकांनी प्रतिसाद दिला या प्रतिसादाचे विश्लेषण करून काही निष्कर्ष मांडण्यात आलेले आहेत या निष्कर्षाच्या आधारे काही शिफारसी सदर संशोधकाने सुचवलेल्या आहेत. या छोटेखानी संशोधनातून नव्या शैक्षणिक धोरणाबाबतची आणि उच्च शिक्षणाबाबत ची प्राध्यापकांकडे असलेली जाण लक्षात येते.

**Key Words** : NEP, ABC, Higher Education

**प्रस्तावना:**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 हे 2022-23 या वर्षापासून पदवी स्तरावर लागू करण्यात आले आहे. याबाबतची जाणीव जागृती विविध माध्यमातून होत असताना दिसते. सदर संशोधकाने विद्यार्थ्यांना वर्गात जाऊन नवीन शैक्षणिक धोरण आणि उच्च शिक्षण याबाबत थोडक्यात माहिती दिलेली आहे. तसेच विविध लेख, पुस्तके व अन्य ज्ञानस्रोतातून आलेल्या माहितीचे विद्यार्थ्यांना, प्राध्यापकांना विविध माध्यमातून प्रसारण झालेले आहे. या धोरणाची आणि उच्च शिक्षणाबाबतची प्राध्यापकांना कितपत जाण आहे हे शोधून काढण्यासाठी सदर संशोधकाने गुगल फॉर्मच्या माध्यमातून एक प्रश्नावली तयार केली व ही प्रश्नावली ऑनलाईन पद्धतीने प्राध्यापकांना पाठवण्यात आली.या प्रश्नावलीस 55 प्राध्यापकांनी प्रतिसाद दिला व नवीन शैक्षणिक धोरण 2020 आणि उच्च शिक्षण याबाबतची सर्व उत्तरे देण्याचा प्रयत्न केला आहे. या सर्व प्रश्नांचे गूगल फॉर्मच्या माध्यमातून ग्राफ,चार्ट तयार झालेले आहेत या ग्राफचे विश्लेषण करून काही निष्कर्ष मांडण्यात आले आहेत व पुढील संशोधनासाठी काही शिफारशीची सुचवण्यात आले आहेत. विविध महाविद्यालयातील वेगवेगळ्या विषयाच्या प्राध्यापकांनी ही प्रश्नावली भरून दिली आहे. त्या आधारे हे संशोधन पूर्ण केले आहे .

**संशोधनाची उद्दिष्टे:**

1. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 आणि उच्च शिक्षण याबाबत प्राध्यापकांना असलेली माहिती जाणून घेणे.
2. मिळालेल्या प्रतिसादाचे विश्लेषण करून निष्कर्ष मांडणे व शिफारशी सुचवणे.

**संशोधन पद्धती :**

सदर संशोधकाने वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा या संशोधन कार्यासाठी उपयोग केलेला आहे .राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि उच्च शिक्षण या विषयाच्या अनुषंगाने प्राध्यापकांकडून गुगल फॉर्मच्या माध्यमातून प्रश्नावली देऊन त्यांच्याकडून ऑनलाइन पद्धतीने ही प्रश्नावली भरून घेण्यात आली. या प्रश्नावली द्वारे मिळालेल्या उत्तरांचे विश्लेषण खालील प्रमाणे करण्यात आलेले आहे. या प्रश्नावलीत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 आणि उच्च शिक्षण याबाबत 15 प्रश्न विचारण्यात आलेले होते या सर्व प्रश्नांची उत्तरे प्राध्यापकांनी भरून दिलेली आहेत. एकूण 55 प्राध्यापकांनी ही प्रश्नावली गुगल फॉर्मच्या माध्यमातून भरून दिलेली आहे. ऑनलाइन पद्धतीने तयार झालेल्या ग्राफ, चार्ट या द्वारे विश्लेषण खालील प्रमाणे केलेले आहे. या विश्लेषणाच्या आधारे निष्कर्ष व शिफारसी मांडलेल्या आहेत.

**प्राध्यापकांनी भरून दिलेल्या प्रश्नावलीचे विश्लेषण :**

विविध विषयाच्या 55 प्राध्यापकांनी सदर प्रश्नावली भरून दिलेली आहे यामध्ये बॉटनी, इकॉनॉमिक्स, हिस्ट्री, लायब्ररी सायन्स, मराठी, फिजिकल एज्युकेशन, पॉलिटिकल सायन्स,झुलाजी, भूगोल या विषयांच्या प्राध्यापकांनी गुगल फॉर्मच्या माध्यमातून ही प्रश्नावली भरून दिलेली आहे




